MAHMARI 19358/13/1/2000 - TC

प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः
विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष अठरावे / अंक ७ / जुलै २०१७

## संपादकीय

## वसाहतवाद जुना आणि नवा

१६ व्या शतकापासून सुरू झालेला वसाहतवाद आणि २० व्या शतकातील दोन महायुद्धे यांनी जगाचा इतिहास आणि भूगोलामध्ये आमूलाग्र बदल केले. या घटनांचे केंद्रबिंदू युरोपमध्ये म्हणजे ब्रिटन, फ्रान्स आणि जर्मनी या राष्ट्रांमध्ये होते. १२ व्या शतकात सुरू झालेल्या प्रबोधन युगाची (Renaissance) पार्श्वभूमी या घटनांच्या मागे होती. १५ व्या १६ व्या शतकाच्या आत-बाहेर झालेली वैज्ञानिक आणि औद्योगिक क्रांती हे या प्रबोधन युगाचेच फलीत होते. या बदलांचा सर्वात मोठा परिणाम हा युरोपमधील धर्मसंकल्पनेपासून समाज संस्थांवरती मोठ्या प्रमाणात झाला.

निसर्गरचना, व्यक्ती, आणि समाज रचनांना विज्ञानामधील प्रगतीमुळे नवीन उत्तरे मिळू लागली, औद्योगिक क्रांतीमुळे माणसांच्या गरजा बदलू लागल्या, एवढेच नाही तर त्यांच्या पूर्तीकरता बाजार, आणि नवीन अर्थकारणही निर्माण झाले. युरोपमधील या सगळ्या बदलांचे संचित घेऊन, १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपपासून वेगळा, पण त्या नवीन संस्कृतीची पाठराखण करणारा 'अमेरिका' हा खंडप्राय देश उदयाला आला. विज्ञान, तंत्रज्ञान, आणि अर्थकारणामध्ये आज हा देश जगामध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. प्रचंड कष्ट, ज्ञान, कौशल्य, दर्जाचा आग्रह आणि आदर, तसेच नागरिकशास्त्राच्या नियमांचे काटेकोर पालन हे त्यांच्या यशाचे गमक आहे. त्यांच्या या गुणांकडे कटाक्षाने दुर्लक्ष करून त्यांच्या चंगळवादी, स्वैराचारी संस्कृतीचा स्वीकार मात्र आपण आंधळेपणाने करत आहोत. सांस्कृतिक वसाहतवादाचे इतके चांगले उदाहरण दुसरे मिळणार नाही.

वैज्ञानिक क्रांतीमुळे लागणारे नवीन नवीन शोध, त्यावर आधारित औद्योगिकीकरण, आणि नवीन बाजारपेठांची निर्मिती यामुळे परंपरागत अर्थव्यवहाराची जागा नवीन अर्थव्यवहारांनी घेतली. यातूनच 'साम्यवाद', त्याचेच भावंड 'समाजवाद' आणि 'पुंजीवाद' निर्माण झाले. 'राजेशाही'ला पर्याय म्हणून 'लोकशाही'चा उदय झाला. वसाहतवादाला पोषक वातावरणही याचवेळी निर्माण व्हायला लागले.

भारतापासून, आफ्रिका, आणि दक्षिण अमेरिकेमध्ये युरोपियन वसाहतवाद पोहोचला आणि त्याचबरोबर त्यांची संस्कृती, समाजव्यवस्था, अर्थकारण, राजकारण आणि त्याला पूरक अशा सगळ्या संस्थांचे संक्रमण या वसाहतींमध्ये झालं.

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

युरोपमध्ये मध्ययुगात, म्हणजे ५ व्या ते १५ व्या शतकापर्यंत सांस्कृतिक अंधारयुग होते असे समजले जाते. याच काळामध्ये भारत, चीन आणि पश्चिम आशियातील सिरिया, इराक आणि इराणमध्ये विज्ञान, साहित्य, संस्कृती, स्थापत्य, कला, व्यापार यांचा भरभराटीचा काळ होता. पश्चिम आशियातील राष्ट्रांमधील वैद्यक, ग्रहगणित आणि गणिताच्या अनेक फारशी आणि अरेबियन भाषांमधील ग्रंथांचे १२ व्या १३ व्या शतकात लॅटीनमध्ये भाषांतर होऊन युरोपमधील प्रबोधनयुगाला सुरुवात झाली होती. दुर्दैवानं वसाहतवाद्यांनी लिहिलेल्या विज्ञानाच्या इतिहासामध्ये या संदर्भाचा पुरेसा उल्लेख केलेला नसतो.

भारतापुरते बोलायचे तर बौद्धिक आणि सांस्कृतिक संपदेच्या विकासाची सुरुवात ख्रिस्तपूर्व ५ व्या शतकात झालेल्या पाणिनीपासून करायला लागते. त्यापुढे झालेल्या कौटिल्याचे अर्थशास्त्र, छंदावरील पिंगलांचा ग्रंथ, चरक, शुश्रुतांचे वैद्यकशास्त्रावरिल ग्रंथ, वात्सायनाचे कामशास्त्र, १२ व्या शतकातील भास्कराचार्च ते १५ व्या शतकातील गणेश दैवज्ञांपर्यंत साहित्य, संस्कृती, स्थापत्याच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये प्रचंड प्रगती झालेली दिसून येते. वैद्यक आणि गणिताचे अनेक संस्कृत ग्रंथ ५ व्या ते १२ व्या शतकापर्यंत पर्शियन आणि अरेबियन भाषांमध्ये भाषांतरीत झाले. 'शून्य' आणि अंकांची ओळख भारताने जगाला करून दिली हे आज सर्वमान्य आहे. सर्जनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये भारताने आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान या काळातच निर्माण केले होते.

भारताची समाजरचना ही त्याच्या भौतिक, आधिभौतिक समजुती आणि तत्त्वज्ञानाच्या विकासाच्या पार्श्वभूमीवर रचली गेली होती. समाजातल्या प्रत्येक समाज घटकाला आणि त्याच्या कौशल्याला या रचनेमध्ये महत्त्वाचे स्थान होते. भारतीय संस्कृतीमधील 'राजन' ही संकल्पना आणि युरोपमधील 'राजा' ही संकल्पना संपूर्णतः भिन्न आहेत. ख्रिस्तपूर्व ३ ऱ्या शतकातील कौटिल्याचे अर्थशास्त्र हा 'राजन' या व्यक्तीची नाही, तर त्या संस्थेच्या जबाबदाऱ्यांची व्यवस्था मांडणारा ग्रंथ आहे. यामध्ये कुठल्याही प्रकारची एकाधिकारशाही अपेक्षित नाही. पूर्वानुभवावर आधारित आणि त्यांचा आदर करीत, भारताच्या सामाजिक नीती मूल्यांची निर्मिती झाली. 'स्वातंत्र' आणि 'जबाबदाऱ्या' याची सुंदर गुंफण यामध्ये दिसून येते.

युरोप आणि भारतीयांचा सांस्कृतिक आणि सामाजिक इतिहास समजावून घेतल्याशिवाय आजच्या आपल्या 'सामाजिक' आणि 'राजकीय' प्रश्नांची उकल होणे कठीण आहे.

ब्रिटिश वसाहतवादी जेंव्हा भारतात आले तेव्हा भाषेपासून सामाजिक, सांस्कृतिक व्यवस्थेतील वेगळेपणाचा साक्षात्कार त्यांना झाला. यातून त्यांनी या सगळ्या संस्थांचा, रचनांचा अभ्यास चालू केला. या अभ्यासामध्ये अनेक ब्रिटिश अधिकाऱ्यांबरोबर धर्मप्रसारकांचाही समावेश होता. कितीही तटस्थता आणण्याचा प्रयत्न केला, तरी श्रेष्ठात्वाच्या भावनेतूनच हा अभ्यास आणि तो इतिहास लिहिला गेला. १९७८ साली एडवर्ड सैद (Edward Sait) यांनी Orientalism हा ग्रंथ लिहून या इतिहासातील उणिवा आणि धोके विस्ताराने दाखवून दिले आहेत.


१६ व्या शतकात होणाऱ्या औद्योगिकिकरणामुळे कुशल कारागिरीची जागा यांत्रिकीकरणाने घेतली. १६ व्या शतकापर्यंत भारत

(पृष्ठ क्र.४० वर)

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा



वर्ष अठरावे/अंक ७/जुलै २०१७

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २२ वे/अंक १ला)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | शांघायचे कला दालन | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | विकासवेध-८: नीलक्रांती | श्री. नरेंद्र गोळे | ६ |
| ४) | नर्मदा परिक्रमा (भाग : ४) | श्री. अरविंद ओक | ९ |
| ५) | सुभाषित-सात शल्ये | प्रा. प्रशांत धर्माधिकारी | १३ |
| ६) | ऋतूंची शोभायात्रा | श्री. अरविन्द दोडे | १५ |
| ७) | फ्रेंच राज्यक्रांती चिरायू होवो! | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | १९ |
| ८) | मनु+युग+अंतरः एक आकलन | प्रा. अपर्णा कुलकर्णी-धर्माधिकारी | ३१ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३४ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून <u>त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही</u>.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# शांघायचे कला दालन

*शांघाय शहरात एक सुंदर कला दालन आहे. या दालनाला भेट देऊन आलेले अनुभव या लेखात विशद केले आहेत. - संपादक*

मागील दहा वर्षांपासून विद्या प्रसारक मंडळाच्या सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळेतील विद्यार्थी चीनच्या बाल विज्ञान तंत्रज्ञान नवनिर्मिती स्पर्धेत (China Adolescent Science and Technology Innovation Contest) सहभागी होत आहेत. ही स्पर्धा दरवर्षी चीनच्या वेगवेगळ्या शहरांत आयोजित केली जाते. ३१ व्या स्पर्धेचे आयोजन शांघाय या महानगरीत करण्यात आले होते. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठीचे निमंत्रण चीनच्या विज्ञान तंत्रज्ञानच्या संघटनेकडून (China Association of Science and Technology) एप्रिल महिन्यातच आले होते. त्यांच्या निमंत्रणावरून सर्व सोपस्कार आटोपून चार विद्यार्थ्यांना सोबत घेऊन मागील वर्षी ऑगस्ट महिण्यात आम्ही शांघायला गेलो होतो. स्पर्धेचे आयोजन उत्तर चीन विद्यापीठात (North China University) केले होते. विद्यापीठाचा परिसर फारच सुंदर होता.



**उत्तर चीन विद्यापीठाचा परिसर**

स्पर्धा सुरूअसताना एका दिवशी दुपारी आयोजकानी आम्हाला बाहेर फिरायला न्यायचे ठरविले. असे ते दरवर्षीच करतात. दुपारी बाहेर फिरायला जायचे आहे एव्हढेच आमच्या दुभाष्याने आम्हाला सांगितले होते. त्यामुळे नेमके काय पाहायला मिळणार याविषयी आम्ही तर्क वितर्क करीत होतो. शांघाय शहरात अनेक मॉल्स आहेत. त्यापैकी एखाद्या मॉलला नेतील असा अंदाज थायलंडच्या आमच्या सहकाऱ्यांनी केला. परंतु त्यांचा अंदाज खोटा ठरला. ठरलेल्या वेळेला सर्व आंतरराष्ट्रीय सभासदांना घेऊन आमची बस विद्यापीठातून निघाली. साधारणपणे अर्ध्या तासाच्या प्रवासानंतर ती एका प्रदर्शनाच्या ठिकाणी जाऊन थांबली. पद्धतशीरपणे विकसित केलेला तो स्वच्छ आणि सुंदर परिसर होता. या मनमोहक अशा दृश्याने आम्ही सर्वजण सुखावलो. प्रत्येकाने आपापले कॅमेरे काढले. छायाचित्र काढून संग्रही ठेवावे असेच ते ठिकाण होते. त्यातील एक छायाचित्र खाली दिले आहे.



**आकर्षक प्रदर्शन स्थळ**

२०१० साली चीनमध्ये एक जागतिक प्रदर्शन (World Expo 2010) भरले होते. त्या प्रदर्शनाच्या आयोजनासाठी हा भाग विकसित करण्यात आला. अशा प्रदर्शनात जगाच्या वेगवेगळ्या कंपन्या आपल्या वस्तू प्रदर्शित करण्यासाठी येत असतात. त्यांना पुरेल एव्हढी जागा उपलब्ध करून द्यायची असते. त्यासाठी

चीनने अनेक इमारती नव्याने बांधल्या. त्यात एका मोठ्या वर्तुळाकार इमारतीचा समावेश होता.



**प्रदर्शनाची वर्तुळाकार इमारत**

प्रदर्शनाचा सम्पूर्ण परिसर मनमोहक आहे. त्यातल्यात्यात लक्ष वेधून घेते ती लाल रंगाची सुंदर इमारत. उलटा पिरॅमिड असावा अशी त्या इमारतीची रचना असून ती इमारत पाच मजल्यांची होती. प्रदर्शनासाठी जागा उपलब्ध करून देणे एवढ्यावरच चिनी लोक थांबले नाहीत, तर चीनच्या समृद्ध संस्कृतीची जगाला जाणीव व्हावी असाही प्रयत्न त्यांनी या निमित्ताने केला आणि एक वेगळीच वास्तू त्यांनी उभी केली. याच वैशिष्ट्यपूर्ण वास्तूजवळ आम्ही उभे होतो. आमच्या गाईडने आम्हाला सांगितले की या इमारतीचे बांधकाम २८ डिसेंबर २००७ ला सुरू झाले. जवळजवळ अडीच वर्षे काम अव्याहत चालू राहिले आणि शेवटी ८ फेब्रुवारी २०१० रोजी या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले. जुन्या काळातील चिनी राजे अशा आकाराचा मुकूट घालत असत. त्यापासून प्रेरणा घेऊन ही वास्तू बनविण्यात आली आहे. हे जिंगतँक (He Jingtang) या वास्तूविशारदाने या इमारतीची रचना केली होती. या पाच मजली इमारतीची एकूण उंची ६३ मीटर एवढी असून इमारतीच्या बांधकामाला त्यावेळी २२ कोटी अमेरिकन डॉलर्स एवढा खर्च आला होता. २०१० मध्ये भरलेल्या जागतिक प्रदर्शनाच्या निमित्ताने ज्या इमारती बांधण्यात आल्या त्यामध्ये ही इमारत सगळ्यात जास्त प्रसिद्ध झाली. तिची प्रसिद्धी पाहून प्रदर्शन संपल्यानंतर सहा महिने ती पर्यटकांसाठी खुली ठेवण्यात आली होती. आजही ही वैशिष्ट्यपूर्ण इमारत पर्यटकांना आकर्षित करीत आहे.



**कला दालनाची इमारत**

जागतिक प्रदर्शन आटोपल्यानंतर शांघाय महापालिकेने या इमारतीचा योग्य उपयोग करून घ्यायचे ठरविले. शहराच्या दुसऱ्या एका भागात शांघाय कला दालन होते. ते त्यांनी येथे आणावयाचे ठरविले. सर्व सोपस्कार आटोपून १ ऑक्टोबर २०१२ रोजी या कला दालनाची सुरुवात करण्यात आली. त्यावेळी 'चीन कला संग्रहालय' (China Art Palace) असे या इमारतीचे नामकरण करण्यात आले. अनेक कलाकुसरीच्या वस्तू या दालनात ठेवलेल्या आहेत. दालनाची जुजबी माहिती देऊन झाल्यावर आम्हाला ते दालन आतून पाहण्याची व्यवस्था आमच्या गाईडने केली. त्यासाठी आवश्यक ती प्रवेश तिकिटे त्यानी आधीच घेऊन ठेवली होती. सुरक्षेचे सर्व सोपस्कार आटोपून आम्ही लवकरच दालनात प्रवेश केला. आत प्रवेश करताच दगडांनी बनविलेले एक वेटोळे नजरेस पडते. या वेटोळ्याजवळ दोन तासांनी भेटायचे असे ठरवून आम्ही वेगवेगळ्या दिशांना निघून गेलो.

बाहेरून अंदाज येत नाही. परंतु दालनाच्या आत गेल्यावर त्याच्या भव्यतेची कल्पना येते. कला दालन

जो झाडावर चढून जातो, त्यालाच फळे तोडण्याचा हक्क आहे. - स्कॉट



**दगडाचे महाकाय वेटोळे**

पाच मजल्यावर विखुरले आहे. त्यात एक लाख साठ हजार चौरस मीटर एवढे मोठे क्षेत्र प्रदर्शनासाठी उपलब्ध आहे. दालनात अनेक विभाग आहेत. रचना अशी विचित्र आहे की आपण कुठून आलो आणि कुठे निघालो हेच कळत नाही. दोन तासात सगळे प्रदर्शन पाहायचे होते. म्हणून आम्ही जवळच असलेल्या मूर्त्यांच्या विभागात शिरलो. या विभागात लहान मोठ्या सर्वच आकाराच्या मूर्त्या आहेत. त्यातील काही दगडाच्या, काही मातीच्या तर काही धातूच्या आहेत. आम्ही आधाशासारखे पटापट फोटो काढू लागलो. त्यातील एक फोटो दिलेला आहे.



**मूर्ती विभागातील एक छायाचित्र**

मूर्त्यांचा विभाग आटोपून आम्ही लवकरच दुसऱ्या दालनात शिरलो. येथे जरा वेगळ्याच प्रकारची कला प्रदर्शित केली होती. रंगीबेरंगी कागदाचे तुकडे जोडून काढलेली चित्रे तिथे प्रदर्शित करून ठेवलेली होती. सगळ्या बाजूला विविध प्रकारची रंगीबेरंगी चित्रे असल्याने तो सम्पूर्ण परिसर मनाला मोहून टाकत होता. त्यात भर तेथे असलेल्या प्रकाश योजनेचा. प्रकाश देणारे दिवे असे लावले आहेत की प्रत्येक चित्र उजळून जाते. या दालनात देखील आम्ही अनेक छायाचित्रे काढली. त्यातील एक नमुन्यादाखल येथे दिलेले आहे.



**मनमोहक कला**

चीनमध्ये अनेक प्रसिद्ध चित्रकार होऊन गेले. त्यातील काही चित्रकारांनी काढलेली चित्रे अजरामर झाली. अशा काही चित्रकारांची चित्रे वेगवेगळ्या दालनात प्रदर्शित केलेली आहेत. प्रत्येकासाठी वेगळा विभाग निर्माण केला आहे. त्या चित्रकाराची चित्रे प्रदर्शित करण्यापूर्वी त्याच्याबद्दलची थोडक्यात माहिती दिलेली आहे.



**एक अजरामर कलाकृती**

(पृष्ठ क्र. ३९ वर)

अद्‌भुतता हा सर्व तत्त्वज्ञानांचा पाया आहे. - माँटेनी

# विकासवेध-८: नीलक्रांती

*नीलक्रांती या महत्त्वाच्या विषयाची माहिती या लेखात विशद केली आहे - संपादक*

भारतातील नीलक्रांती ही १९६० च्या सुमारास घडून आलेल्या हरितक्रांतीचाच एक विस्तार आहे. पर्यावरणीय आणि राजकीय पुनर्निर्माणाचाच तो एक हिस्सा आहे. पिण्याचे पाणी उपलब्ध असणे हेच भारतीयांकरता अवघड आहे तिथे मत्स्योत्पादनास पाणी आणायचे कुठून ह्या दोन्हींही समस्यांतून सुटका करून घ्यायची असेल तर निरंतर जलसंधारणास पर्याय नाही. त्यानेच, विशेषतः जलजीवांच्या बाबतीत, पर्यावरणीय सकारात्मक उपप्रभाव लाभू शकतील. जगभरातील समुद्रांतून अतिमासेमारी सुरूच असतांना हे लाभ अत्यंत मोलाचे ठरतील. महत्त्वाची आणि अतिशय उत्पादक कृषी कार्यवाही म्हणून झालेल्या, जलजीवांच्या (ऍक्वाकल्चर) लक्षणीय उदयासच 'नीलक्रांती' असे संबोधले जात असते.

मासे आणि जलजीव संवर्धनासंदर्भात आपल्या देशात प्रचंड दोहनक्षम सामर्थ्य आहे. ज्याचा आपले राहणीमान उंचावण्याकरता उपयोग होऊ शकेल. ह्या संदर्भातील शास्त्रीय अभ्यासास इंग्रजी भाषेत फिशरीज (fisheries) म्हणतात, तर हिंदी भाषेत मात्स्यिकी म्हणतात. आपण मराठीतही मात्स्यिकी हाच शब्द वापरू या. जलजीवांचा भावी विकास; नवे आणि उन्मेषशाली उत्पादक तंत्रज्ञान व व्यवस्थापन ह्यांच्या अवलंबावर आणि आजवर क्वचितच वापरल्या गेलेल्या जलसंसाधनांच्या वापरावर; तसेच सुयोग्य विपणन संबंधांवर आधारलेला आहे. पाणवठ्यांतील मात्स्यिकी; देशातील मत्स्योत्पादन वाढवण्याच्या भरपूर संधी उपलब्ध करून देत असते. समुद्री क्षेत्रात, किनारी मात्स्यिकी जरी पूर्णतः दोहली गेली असली तरी, आपल्या खोल समुद्रातील मात्स्यिकीचे दोहनक्षम सामर्थ्य अजूनही पुरते वापरले गेलेले नाही. विविधता आणि मूल्यवान उत्पादनांच्या आधारे ह्या क्षेत्रास नवे आयाम लाभू शकतात. ह्या क्षेत्राचे संपूर्ण दोहन करण्यासाठी, मत्स्योपादनापश्चात सुयोग्य हाताळणी, ऱ्हास टाळणे, आणि आरोग्यपूर्ण प्राथमिक प्रक्रिया करणे अत्यंत महत्त्वाचे असते. त्याच वेळी मत्स्यकर्मींना पुरेसा लाभ मिळण्याकरता प्रभावी विपणन व्यवस्था करावी लागत असते. त्याखेरीज ग्राहकांना उत्तम प्रकारची मत्स्योत्पादने परवडण्या योग्य भावात उपलब्ध होतील ह्याची काळजीही घ्यावी लागत असते. हे लक्षात घेता, योग्य गुंतवणूकीपासून तर प्रभावी विपणनापर्यंत सर्व बाबींचा संपूर्ण विचार होणे ह्यासाठी अपेक्षित आहे. मगच उत्पादकांना आणि ग्राहकांना एकाच वेळी संतोष लाभणे संभव होईल. ह्या पार्श्वभूमीवर, राष्ट्रीय मात्स्यिकी विकास मंडळाने, निरनिराळ्या पेढ्यांच्या समन्वयातून आणि सार्वजनिक-खासगी भागिदारीतून हे साध्य करण्याचा प्रयास चालवलेला आहे (१).

२० जून २०१६ रोजी केंद्र सरकारचा एक निर्णय घोषित झाला (२) की, मासे आणि मत्स्योत्पादने ह्यांची निर्यात, जी २०१४-१५ साली ३३,४४१ कोटी रुपये होती, ती पुढील पाच वर्षात १,००,००० कोटी रुपयांपर्यंत वाढविण्याची सरकारची योजना तयार झाली आहे. ह्याकरता सागरी, निमखारे पाणी, आणि भूजल

ह्या तिन्ही विभागात, खोल समुद्रातील मासेमारी, गळाच्या सहाय्याने टयूना मासेमारी, सागरी जलजीव संवर्धन, जलाशयातील मत्स्यव्यवसाय विकास, मासेमारी पश्चात तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि विस्तार इत्यादी नवीन कार्यक्रम; राष्ट्रीय मात्स्यिकी विकास मंडळाच्या सहाय्याने हाती घेण्यात आलेले आहेत.

**सागरी:**



नवीन मच्छिमारी बंदरांची उभारणी आणि सध्या अस्तित्वात असलेली बंदरे आणि फलाटी यंत्रांना बळकट करणे, मध्यम नौकांमध्ये वाढ आणि आधुनिकीकरण, सागरीजीव संवर्धन, कालवांचे संवर्धन, समुद्रात मत्स्य व कोळंबी बीज संचयन यंत्रांची सुरवात करणे, गळाच्या सहाय्याने टयूना मासेमारी (खोल समुद्रातील मासेमारी) सुरुवात करणे. अटलांटिक समुद्रात सापडणारे निळ्या कल्ल्यांचे ट्युना मासे सरासरी दोन मीटर लांबीचे आणि शेकडो किलो वजनाचे असतात. खोल समुद्रात गळांच्या साह्याने त्यांची मासेमारी केली जाते. ट्युना मासे, प्रथिने आणि ओमेगा-३ तेलयुक्त मेदाम्लांचे समृद्ध स्रोत असतात. म्हणून त्यांच्या मासेमारीचे प्रमाण हल्ली एवढे वाढले आहे की, हे प्राणी संकटग्रस्त झालेले आहेत.

**निमखारे पाणी :**

कोळंबी उत्पादन वाढविण्याकरिता सध्या कार्यान्वीत असलेल्या निमखारे पाणी जलजीव संवर्धन प्रकल्पांमध्ये वाढ करणे, किनाऱ्यालगतच्या मत्स्यसंवर्धकांचे प्रशिक्षण आणि मनुष्यबळ विकास करणे, किनारा जलसंवर्धन प्राधिकरणाच्या निकषांनुसार नवीन मत्स्यसंवर्धन प्रकल्पांची उभारणी करणे सध्याच्या कोळंबीशेती प्रकल्पांची उत्पादकता वाढविणे, तसेच अधिक क्षेत्र निमखारेपाणी मत्स्य संवर्धनाखाली आणणे. यामधून कोळंबी उत्पादन वाढविणे.

**भूजल:**

मत्स्यबीज उत्पादन केंद्रातून इष्टतम मत्स्यबीज निर्मिती करणे, जलाशयी मत्स्यव्यवसाय विकास प्रशिक्षण आणि विस्तार करणे, विक्री सुविधांचे बळकटीकरण करणे, भूजलाशयी मत्स्यव्यवसाय सांख्यिकी आणि माहिती जाळ्याचे बळकटीकरण करणे.


महाराष्ट्र राज्याच्या (३) सामाजिक व आर्थिक विकासातही मत्स्यव्यवसाय विभागाचा महत्त्वाचा वाटा आहे. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील लोकांकरिता रोजगार मिळण्यासाठी मत्स्यव्यवसाय क्षेत्र हा महत्त्वाचा स्रोत आहे. विभागाचा उद्देश आर्थिक मागासवर्गास मदत करणे आणि मत्स्यव्यवसायाच्या विविध क्षेत्रात आधुनिक प्रामाणित तंत्रज्ञान आत्मसात करुन मत्स्यव्यवसायाचा विकास करणे हा आहे.

मत्स्यव्यवसाय क्षेत्रामुळे आर्थिक मागासवर्गीयांस रोजगार, स्वस्त व पोषक अन्न उपलब्ध होते; तसेच देशाला परकीय चलन प्राप्त होते. विभागाने विविध साधनसंपत्ती पद्धती, संधी, संभाव्य धोके इत्यादी बाबीं लक्षात घेऊन भविष्यासाठी धोरण निश्चित केले आहे.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपूर्वीच्या मुंबई इलाख्यात गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटकच्या किनारपट्टीचा भाग समाविष्ट होता. श्री. डब्ल्यु. एच. ल्यूकस या सनदी अधिकाऱ्याने सन १९१० मध्ये सिंध व्यतिरीक्तच्या मुंबई इलाख्यातील सागरी मत्स्यव्यवसायाचा अभ्यास करून सरकारला अहवाल सादर केला. ही सरकार दरबारी महाराष्ट्रातील मत्स्यव्यवसायाची घेतली गेलेली पहिली दखल. मासळी खारविण्याची (त्यावेळची) पद्धत समाधानकारक असून

मच्छिमार नौकांना करमुक्त मिठाचा पुरवठा करावा अशी शिफारस या अहवालात होती. मच्छिमार समाजातील तरुणांना व्यापारी जहाजावर आणि मुंबईतील गिरण्यांमध्ये मिळणारा अधिक आकर्षक रोजगार हे मत्स्यव्यवसायात प्रगती न होण्याचे प्रमुख कारण या अहवालात नमूद होते.

हल्ली भारत सरकारच्या मत्स्यदृष्टी, मत्स्यदर्शिनी, मत्स्यनिरीक्षणी, मत्स्यवर्षिणी, मत्स्यशिकारी, सागरिका, समुद्रिका, लवणिका इत्यादी मासेमारी नौका मात्स्यिकी व्यवसायांवर देखरेख करतात.



**'मध्यखोली मासेमारी'**

स्वयंचलित नौकांतून हल्ली मासेमारी कशी केली जाते हे आपण आता पाहू. दाराची चौकट आडवी धरावी तशी एक अत्यंत हलक्या पदार्थाची चौकट पाण्याच्या पातळीस लंब धरून पाण्याच्या खोलीत मध्यावर राहील अशी धरली जाते. ह्याकरता तिच्या वरच्या दांड्यास तरंगते ठोकळे जडवलेले असतात, तर खालच्या दांड्यास बुडती वजने बांधलेली असतात. ह्या चौकटीस धरून कृत्रिम दोरांचे जाळे मागील दिशेस लोंबते सोडलेले असते. मोकळ्या बाजूस ते जाळे बंद असते. चौकटीस लांबलचक दोर बांधून ती मासेमारी नौकेस बांधून ठेवलेली असते. नौका जशी जशी समोर चालत राहते तसे ह्या जाळ्यात मासे आणि अन्य जलजीव गोळा होत राहतात. जलाशयाच्या खोलीत साधारणतः मध्यावरून ओढल्या जाणाऱ्या जाळ्यात मासे धरले जात असल्याने ह्या मासेमारीस 'मध्यखोली मासेमारी' म्हटले जाते.

ह्यापेक्षा निराळीही एक पद्धत आहे, जिच्यात जाळे समुद्रतळास लगटून ओढले जात असते. तिला 'समुद्रतळातील मासेमारी' म्हटले जाते. मात्र तिच्यात समुद्रतळ खरवडला जात असल्याने तिला पर्यावरणस्नेही मानले जात नाही. मात्र तिच्यात मिळणारे जलजीवही निराळे असतात आणि त्यांचा विवक्षित बाजारही आहेच आहे. जाळ्याच्या तळाचा भाग तळास लगटून ओढला जावा अशा पद्धतीने त्यास वजने बांधलेली असतात.



**'समुद्रतळातील मासेमारी'**

**संदर्भः**


१. राष्ट्रीय मात्स्यिकी विकास मंडळाचे संकेतस्थळ http://nfdb.gov.in/

२. टाईम्स ऑफ इंडियामधील एक बातमीः सरकारची 'नीलक्रांती' योजना http://timesofindia.indiatimes.com/india/govt-plans-to-unleash-blue-revolution/articleshow/52825371.cms?from=mdr

३. महाराष्ट्र राज्यातील मात्स्यिकीचे संकेतस्थळ https://fisheries.maharashtra.gov.in/



**– नरेंद्र गोळे**

१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

# नर्मदा परिक्रमा

**भाग : ४**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत - संपादक*

**दिवस ५ वा : मंगळवार २६/११/२०१३**

सकाळी माझ्याकडला गूळ व पुऱ्या घरात देऊन टाकल्या. कारण अळशीचा काढा किंवा मुलांसाठी चहा करायचा तर दूध नसतेच पण गूळ/साखरही नव्हती. रात्री मुलांना गूळ मी दिला होता. त्यामुळे आज मागणी झाली. सोबत पुऱ्याही दिल्या व मैय्यावर सर्व सोपवून दिले. पुऱ्या असल्यामुळे सकाळचे भोजन, नाष्टा न मिळाला तरी चालत होते. याच हेतूने असूनही काल रात्री मी जेवताना पुऱ्या काढल्या नव्हत्या.

जोपर्यंत माझी ही तरतूद होती तो पर्यंत मला दुपारचे भोजन मिळाले नव्हते. आज मात्र निघताना माझ्याकडे बिस्किटेही नव्हती. गढ पाथर आल्यावर प्रथम बिस्किटाचे दोन शंकर किराणामधून विकत घेतले. बसून तिथेच एक खाल्ला, कारण भोजनाची वेळ झालीच होती आणि भोजन कुठे मिळू शकेल का अशी विचारणा दुकान मालकिणीकडे केली आणि पाच मिनिटात मी गरम भात वरणावर ताव मात होतो. कारण त्यांनीच मला जेवायला दिले.

गढ पाथरपर्यंत रस्ता हा कच्चा, ८०° शेतबांधावरून तर कधी नांगरल्या शेतातून, बांधाच्या कडेने होता. भात काढून झाले आहे. आता नांगरताना गव्हाची पेरणी होत आहे. काळ्या मातीची मोठमोठी ढेकळे आहेत. काही बांधावरही टाकलेली आहेत. त्यामुळे चालताना त्रास होतो.

बांधावरचा रस्ता म्हणजे दीड दोन फुटाचा तोही पावसाळ्यातला चिखल वाळूत झालेला. त्यामुळे उबडखाबड आहे.

शेतांच्या बांधावर आणि इतरत्रही झाडे आहेत. बांधावरचा रस्ता कधी कधी झाडीतून (दुतर्फा) जातो. वाळलेल्या काटेरी फळांची झुडपे पायाशी असल्याने ती फळे सतत लुंगीला, मोज्यांना चिकटतात व त्वचेला टोचली की अस्तित्व कळते. सारखी काढून टाकावी लागतात.

पिवळ्या फुलांची बिट्टी भरपूर दिसते. जास्वंद कुंपणाला असते. वाटेत पिंपळाची भव्य झाडे (वृक्ष) दिसतात. अतिभव्य, विशाल वृक्षांवर मधाची १०/२० पोळी लागलेली दिसतात तर दोन ठिकाणी पिंपळावर असंख्ये पोपटांचे निवासस्थान पाहिले. पाण्याच्या कडेला, टेकडांवर हारीने बसलेले पांढरे श्वेत बगळे पाहिले.

आजूबाजूला विस्तीर्ण भाग दिसतो व पठारांवर असंख्य झाडे आहेत. दुर्दैवाने नावे मात्र ठाऊक नाहीत परंतु जांभळाची झाडे मात्र ओळखली, काही आंब्याची झाडे आहे.

गणेश पुष्पे आणि टणटणी (शेंदरी) ही तर हक्काने जिकडे तिकडे भरलेली दिसली.

सर्व परिसर नयनरम्य हिरवा आहे. पावसाळा नुकताच संपल्याने माळ, पठारे हिरवी आहेत.

वाटेत कुठेतरी मैय्याकिनारा लागला आणि आनंदाने चैतन्याचे दर्शन घेत किनाऱ्याने निघालो. काही अंतर गेल्यावर नदी संगम लागला. बूट काढल्याशिवाय जाता आले नसते. अंतर सहा-आठ फुटांचेच होते. वरच्या

अंगाला कुठेतरी बांध, पूल काही असेल म्हणून वर चढलो.

खरे इथे येण्यापूर्वी एक नदी जी उथळ पण चांगलीच रुंद पात्राची होती ती ओलांडण्यासाठी बूट काढले होतेच. खडक, उथळपाणी परंतु सर्व ठिकाणी उथळ नव्हती तर उडी मारून खडकांवरून पलीकडे जाता येईल असेही नव्हते. खडकांची सलग रांग नव्हती. ८०% खडक पार केले तरी २०% भागात खोल पाणी की जे उडी मारून पार करता येणे शक्य नव्हते, त्यामुळे बूट काढले होतेच.

आता पुन्हा काही वेळातच पुन्हाही पाळी आली होती म्हणून पूल किंवा बांधाचा शोध. इकडून जा, तिकडून जा करीत लक्षांत आले की पर्याय नाही. शेते ओलांडून कुठे दूर दूर चाललो होतो तो एका शेतकऱ्याने टेकडीवरून आवाज देऊन बोलावले. शेते ओलांडत त्या दिशेने गेलो तर पाण्याचे तेच परंतु चिखलमय पात्र बूट काढले, पाय टाकला तो सरळ ढोपरापर्यंत रुतला. दुसरा टाकला तोही तसाच चिखलात रुतला. एकदा चिखलात उतरल्यावर काही वाटत नाही. त्याच प्रवाहात, लागलेला चिखल काठीने काढण्याचा असफल प्रयत्न केला.

एका हातात काठी, एका हातात बूट, लुंगी दुमडून बांधलेली आणि तोल सावरत काठीने पोटऱ्यांचा चिखल काढण्याची खटपट फार कामी आली नाही. पाण्यातून वर चढताना दोन्ही पाय पुन्हा बरबटले.

टेकडीवरून तो शेतकरी तपेले घेऊन धावत खाली आला. प्रवाहातले पाणी घेऊन माझ्या पायावर ओतत राहिला आणि मी बूट बाजूला ठेवून व्यवस्थित पाय स्वच्छ केले.

तिथून त्याच्या सल्ल्यानुसार दिशा धरून गेल्यावर कच्चा रुंद रस्ता मिळाला. पिपरटोला-दमेहीसाठी बऱ्याच वेळाने आणखी एक नदी बूट काढून ओलांडावी लागली.

दुपारनंतर गावात शिरलो. नदी ओलांडल्या नंतर पक्की सडक लागली. गावात व्यवस्था आहे वगैरे कळले होते परंतु कुठे काही नव्हते. धर्मशाळा, मंदिर इ. बंद! विचारले तर उघडे यात्रीनिवास की खुली धर्मशाळा त्याकडे बोट दाखविले. तिला फक्त छत होते आणि आत सर्वत्र उभे बांबू (पराची) लावून बहुधा रंगकाम /दुरुस्ती काम सुरू असावे. उघड्यावर किंवा तिथे झोपणे यात काही फरक नव्हता.

तेवढ्यात कुणी २५ एक वर्षाच्या तरुणाने चौकशी केली व घरी आसरा देण्याचे आश्वासन देऊन तो छोट्या मुलासह दमोहीच्या दिशेने गेला.

वस्तू, सरंजाम मी उतरवून निवान्त मंदिराच्या पायरीवर बसून होतो. बराच वेळ झाला. याचा पत्ता नाही. एक बस रस्त्याने वर निघून गेली. ती मी पाहिली परंतु मी थोडा दृष्टिआड होतो.

जवळपास अर्धापाऊण तास झाला. संध्याकाळ नंतर माझी परिस्थिती दयनीय झाली असती.

दुसरी बस आली राजेन्द्रनगर! धावत जाऊन मी चौकशी केली. बिलासपूरला जाईल कळल्यावर मी विनंती करून माझे सामान होते तिथपर्यंत बस पुढे घेऊन थांबविली व आत चढलो.

बस अमरकंटक रस्त्याला जाते कळल्यावर पुढे जायचे ठरविले व तासभर प्रवास करून संध्या. ५ वाजता अमरकंटकच्या अलीकडे चोवीस कि.मी. वर खाली उतरलो (रु.३०).

सकाळी ७ ते संध्याकाळी ३। पर्यंत मी पायी प्रवास केल्यानंतर ४ वाजता बस धरली होती.

नोनाघाटीला उतरलो आणि समोर एक धाबा होता तिथे निवासाची चौकशी केली. पण सोय नव्हती. स्वास्थ्य चिकित्सालया शेजारी प्राथमिक विद्यालय होते. तिथे पाहावे म्हणून चिकित्सालय, जे उघडे होते तेथील (सुधा शर्मा) बाईंकडे चौकशी केली.

अंगणवाडीची किल्ली पाहायला त्या स्वतः जाऊन आल्या. परंतु राजेन्द्रनगरला राहणारे संबंधित शिक्षक किल्लीसह घरी गेले होते.



प्रसूतिसाठी सोय म्हणून स्वास्थ्यकेंद्र २८ तास उघडे असते. विचारले तर तिथे सोय होऊ शकली असती. परंतु रात्री अपरात्री बाळंतपणाचे रुग्ण येऊ शकतात. त्यामुळे तो विचार सोडावा लागला.

आजूबाजूला विचारले तर नन्नाचा पाढा! एकाने (तरुणाने) समोरच्या बस स्टॉपकडे बोट दाखविले. वैतागून मी म्हटले, 'तू येतो का तिथे झोपायला? तर मी पण येतो! 'मैं क्यूँ आऊँ, मेरा घर नही है क्या?' असे उत्तर मिळाले.

मी म्हटले, 'मग मी काय पशू वाटतो का तुला? या थंडीत मी गारठून मेलो तर तुम्हालाच त्रास होईल.

'फिर जगह नही घरमे तो क्या जबरदस्ती है क्या?' असे त्याने म्हटल्यावर मी म्हटले निदान असा सल्ला देत जाऊ नकोस.

शाळेच्या संकुलात प्रा. शाळेची एक पडीक सोडून दिलेली वास्तू होती. तिला दरवाजे नव्हते. खोल्यांमध्ये दगडगोटे केरकचरा होता. कौलारू मोडके छप्पर होते. परंतु ओसरी मात्र स्वच्छ होती व तीन फुटांचा विटांचा कठडा असल्याने वारे सरळ अंगावर आले नसते. वर छप्परही होते.



पडवी स्वच्छ करून तिथेच आसन लावले. अशोकने दिलेल टॉर्च वजा कंदील किंवा कंदील वजा टॉर्चचा छान उपयोग झाला. चिकित्सालयावर एक दिवा होता. त्यामुळे परिसरात तितका उजेड होता.

एक कांबळे व एक सतरंजी बाईंकडून मिळविली. खाली खताच्या गोणीची सतरंजी, वर ही सतरंजी व स्लीपिंगबॅगच्या आत पांघरण्यासाठी ब्लँकेट, दोन लुंग्या, शर्ट, स्वेटर, विंडचिटर, पायमोजे हातमोजे, कानटोपी इतका बंदोबस्त करून उघड्यावरील थंडीपासून संरक्षण केले.

दरम्यान मला बाईंनी कोरा चहा न मागता दिला होता. तिथे दिव्याची चांगली सोय असल्याने डायरीसाठी मी तिथे बसलो होतो. दिवे लपंडाव करीत होते. बॅटरीवरच बरीच डायरी लिहिली. पूजा करून जेवलो.

माझ्यासाठी माताराम शर्मांनी पोळी व दोन भाज्या असा जेवणाचा अचानक नैवेद्य तयार केला. निवासाच्या नाइलाजाचे दुःख त्यांना होते. त्याचबरोबर लूटपाट, फसवणुकीचे काही प्रकार पाहिल्यामुळे डळमळलेला विश्वास त्यांच्या बोलण्यातून व्यक्त झाला. वडिलांनी परिक्रमा केलेली आहे. परिक्रमावासीला भोजन तरी द्यावेच द्यावे असा त्यांचा संस्कार होता.

रात्री छान झोप लागली.

**दिवस ६ वा : बुधवार २७/११/२०१३**

सकाळी उठलो. बादली मिळाली, हातपंपावर

स्नान उरकले.

सामान आवरले. स्लीपिंग बॅगखाली असलेल्या (खताच्या) सतरंजीला ओट्याच्या सान्निध्याने ओल धरली होती. सव्वा-सातला निघालो. हल्ली सकाळी चहा, न्याहरी विसरलो आहे. अमरकंटक २४ कि.मी. वर आहे. एका दिवसात कापणे कठीण आहे. रस्त्याच्या दुतर्फा उंच झाडे (निलगिरी) आहेत. थंडावा आहे, हिरवेगार पहाड सोबतीला आहेत.

७/८ कि.मी. नंतर टपरीवर चहा व न्याहारी (समोसा, डाळवडा) करता आली. रस्त्याला लागलेली ही पहिलीच अशी सोय! गावागावात दुकाने आहेत. बिस्किटे इ. मिळतात. पण चहा किंवा असे पदार्थ मिळत नाहीत.

भरपूर फोटो काढले. जोगीटिकरियापासून मी भरपूर फोटो काढले आहेत.

अमरकंटकला जाणारी पहिली बस तुफान भरलेली दिसली. मधे काही बसेस रिकाम्या गेल्या. मी चालत होतो, फोटो काढत होतो. अमरकंटक १५ कि.मी. वर असताना येणारी बस पाहिली व त्यानेही पाहून थांबा नसताना थांबून मला आत घेतले.

मी बस धरली ती एका विशाल पाणीसाठा असलेल्या बांधाजवळ!

दहा रु. देऊन मी अमरकंटक गाठले. पंधरा मिनिटांनी अकरा-साडेअकरा वाजता मी कल्याण आश्रमात शिरलो.



बारा वाजेपर्यंत प्रतीक्षा केल्यावर मला नर्मदा निवासात खोली मिळाली. सुदैवाने भोजनही मिळाले. भोजनोत्तर साबण लावून कपडे धुतले. अंगालाही आज सकाळी प्रथमच साबण लागला होता.

कल्याणाश्रम खरोखर भव्य आहे. निवासासाठी भरपूर दुहेरी खोल्या आहेत. आत दोन पलंग, गादी उशी ब्लँकेटसह! ड्रेसिंग टेबल, आरसा, पत्र्याचा रॅक, सामान टांगायला हूक, न्हाणीघर, वॉशबेसिन इ. सोयींनी युक्त आणि स्वच्छ नीटनेटका आवास आहे.

संध्याकाळी चार पर्यंत विश्रांती घेऊन, चहापानानंतर बाहेर पडलो व नर्मदा उद्‌गम दर्शन करून आलो.



येताना मृत्यूंजय आश्रमात डोकावले तर पुण्याचे देशपांडे दांपत्य भेटले. शुक्रवारी परिक्रमा इथून सुरू करणार आहेत. श्री. देशपांड्यांनी २००३ साली पायी परिक्रमा केलेली आहे.

१ तास तिथे काढून ७। वाजता आश्रमातील आरतीला उपस्थित झालो व ८.३० वाजता भोजन झाले व आता डायरी लेखन केले. तत्पूर्वी मैय्याची पूजा केली.

निजायला रात्रीचे बारा वाजले.

**- अरविंद ओक**

मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

•••

# सुभाषित
# सात शल्ये

*मनाला टोचणाऱ्या सात गोष्टींचा उहापोह केलेले भर्तृहरीचे सुभाषित - संपादक*

**शशीदिवसधूसरो गलितयौवना कामिनी**
**सरो विगत वारिजं मुखमनाक्षरं स्वाकृतेः**
**प्रभुर्धनपरायणो सक्त दुर्गतः सज्जनो**
**नृपांगणगतः खलो मनसि सप्त शल्यानि मे।**

नीतीशतकम् (४७)

दिवसा फिकट दिसणारा चंद्र, तारुण्य ओसरून गेलेली सुंदर स्त्री, कमळे नष्ट झालेले सरोवर, गोऱ्यागोमट्या माणसाचे निरक्षर मुख, हावरा मालक, सतत दारिद्र्याने गांजलेला सज्जन आणि राजदरबारी वावरणारा दुष्ट पुरुष – हे माझ्या अंतःकरणातले सलते काटे आहेत.

भारतीय परंपरेमध्ये 'कवी' हा शब्द परमेश्वराचे विशेषण आहे. शब्दांची जुळवाजुळव करून यमकांची मोट बांधून कविता करणारा असा याचा आशय खचितच नाही. जो आपल्या वैयक्तिक जाणिवांच्या पलीकडे जाऊन वैश्विक संवेदनांना कवेत घेतो तो कवी. आपल्या जाणिवांचे आकाश अधिक व्यापक बनवत जनसामान्यांना कालंजयी जीवनदृष्टी देणारा क्रांतदर्शी म्हणजे कवी. असं असलं तरीही आपल्या आजूबाजूला घडत असलेल्या घटनांचा कवीवर निश्चितंच परिणाम होत असतो. भर्तृहरीला देखील समाजातील काही गोष्टी खटकल्या. त्याने त्या खूप छान पद्धतीने मांडल्या. प्रत्येकाच्या मनाला काही शल्ये बोचत असतात. मुळात 'शल्य' हा शब्दही गमतीशीर आहे. महाभारत युद्धात कर्णाचा सारथी हा शल्य होता. हा शल्य कर्णाला सारखं टोचून बोलत असे. या टोचून बोलण्याने कर्णाचा आत्मविश्वास खच्ची करण्याचा शल्याचा मानस होता. यावरून एखादी गोष्ट मनाला खात असेल तर तिला 'शल्य' म्हणायचा प्रघात पडला.

भर्तृहरीने वरील श्लोकात त्याच्या मनाला टोचणाऱ्या सात गोष्टींचा ऊहापोह केला आहे. यातल्या सातही गोष्टी आजच्या घडीला देखील तेवढ्याच खऱ्या वाटतात. किंबहुना त्याची दाहकता अधिक वाढली आहे. खऱ्या कवितेचं हेच लक्षण आहे की ती कितीही जुनी झाली तरीही नित्य नूतन वाटते. Ezra Pound म्हणतो "Literature is a news which stays news".

कवीच्या मनातलं पहिलं शल्य आहे ते म्हणजे दिवसा तेजोहीन होत असणारा चंद्र. चंद्र हा रात्री अधिक प्रकाशमान होतो. टिपोरं चांदणं पडलेलं आणि त्याच्यात सर्व तारकांचा स्वामी चंद्र मोठ्या दिमाखात मिरवत असतो. मात्र दिवसा सूर्याच्या तेजाने तो 'धूसर' वाटतो. कवीला चंद्राकडे 'धूसर' अवस्थेत पाहून वाईट वाटतं. 'चंद्र' ही कवींची खूप आवडती प्रतिमा आहे. चंद्राचा उल्लेख सर्व देश, प्रांत व भाषांमधील कवींनी केला आहे. सुंदर स्त्रीच्या चेहऱ्याला चंद्राची उपमा देतात. 'चंद्रानना' किंवा 'चंद्रमुखी' असे शब्द प्रचलित आहेत. मात्र चंद्रापेक्षा प्रकाशमान असलेल्या सूर्यासमोर तो धूसर होतो व कवीला ते दृश्य पाहून वाईट वाटतं.

दुसरं शल्य फार बोलकं व सुंदर आहे. कवीला यौवन सरलेली सुंदर स्त्री पाहिली की वाईट वाटतं. 'यौवन' हा सौंदर्यांचा आधार आहे व सौंदर्य हा यौवनाचा अलंकार. 'वयात येताना स्त्रीयांच्या अंगावर लावण्याची

नव्हाळी येते' असं ज्ञानेश्वर म्हणतात.

**का प्रथमवयसाकाळी। लावण्याची नव्हाळी।**
**दिसे जैसी आगळी। अंगनाअंगी।।**

स्त्रीच्या सौंदर्याचं बहारदार वर्णन सर्वच भाषांतील साहित्यात वाचायला मिळतं. विशेष करून कालिदास. मात्र एखादी सुंदर स्त्री जेव्हा वयाने वृद्ध होते तेव्हा तिचं गेलेलं यौवन कवीला खटकतं व हे शल्य त्याला बोचत राहतं.

कवीच्या मनाला बोचणारं तिसरं शल्य म्हणजे कमळ नसलेलं सरोवर. कमळांच्या पुंजाने विलसणाऱ्या अनेक सरोवरांचं वर्णन संस्कृत साहित्यात आढळतं. सरोवराला शोभा ही त्यातील कमळांनी व कमळाभोवती मकरंदाचं रसपान करणाऱ्या भ्रमरांनी असते. कालिदासाच्या अभिज्ञान शाकुंतलात बाणाच्या कादंबरीत याचे खूप उल्लेख आढळतात.

कवीला अजून एका गोष्टीकडे पाहून खूप वाईट वाटतं व ते म्हणजे सुंदर दिसणारा पण बुद्धिहीन माणूस. हे चौथे शल्य. दिसायला सुंदर असणारी पण अक्षर ओळख नसणारी व्यक्ती पाहिली की कवीला वाईट वाटतं. केवळ बाहेरून सौंदर्याची निगा राखणाऱ्या पण साहित्य 'संगीत' कला यांची चाड नसणाऱ्या व्यक्तीबद्दल तर कवीला म्हणायचं नाही ना? विद्येची महती यातून आपल्याला दिसते. संत चोखामेळा म्हणाले–

**उस डोंगा, परि रस नोहे डोंगा**
**काय भुललासी वरलिया रंगा।**

असं म्हणतात कि चाणक्य, सॉक्रेटिस आदी अत्यंत बुद्धिमान माणसं दिसायला फार सुंदर नव्हती पण लोकोत्तर काम करून गेली. या आदर्शांच्या तुलनेत कवीला बुद्धिहीन पण दिसायला सुंदर अशा व्यक्तीकडे पाहून वाईट वाटतं.

कवीला वाटणारं पाचवं शल्य म्हणजे फक्त पैशाच्या मागे लागलेला राजा. 'प्रभू' या शब्दाचे अनेक अर्थ घेता येतात. केवळ अर्थप्राप्तीच्या मागे लागलेल्या सर्वांनाच हे उद्देशून आहे. राजा हा सर्व कलांची जाण असणारा, चांगल्या व गुणीजनांची पारख असणारा असावा. प्लेटोच्या भाषेत तो 'Philosopher King' असावा. चाणक्याने अर्थशास्त्रात, अण्विशिकीत्रयी वार्ता दंडनितीश्च शाश्वतः।' असं म्हटलंय. प्रत्येक गोष्टीचं साकल्यानं अन्वेक्षण करून व्यवहार करणारा, धर्मशास्त्रांचं मूलगामी चिंतन असणारा, दंडनीतीचा वापर करणारा राजा असावा. मात्र केवळ पैशाच्या मागे फिरणाऱ्या राजाकडे पाहून कवीला वाईट वाटतं.

समाजामध्ये सज्जन व्यक्तीला सतत दुर्गतीला जाताना पाहून कवीला विषाद होतो. सज्जनाचं सतत हालअपेष्टांनी भरलेलं जीवन हे कवीला रुतणारं सहावं शल्य. आपल्या आसपास ही गोष्ट आपणास आजही पाहायला मिळते. चांगल्या वागणाऱ्यास, सात्विक व्यक्तीस नेहमीच दुःख भोगावी लागतात. सज्जनाची दुर्गती पाहून कवीला खूप वाईट वाटतं. पात्रता, योग्यता, संवेदनशीलता, दूरदृष्टी असूनही सज्जन व्यक्तीला योग्य तो सन्मान, संपत्ती मिळत नाही.

राजाच्या दरबारी असलेला खलपुरुष हे सातवं शल्य. राजाच्या अवतीभोवती विद्वान मंत्री व आमात्य असणे अपेक्षित असते. जेव्हा एखादा खलपुरुष राजाचा सल्लागार होतो तेव्हा एकूणच प्रसंग बाका ओढवू शकतात. महाभारतात गांधार नरेश शकुनी हा दुर्योधनाला वाईट सल्ले देत असे. पांडवांवर विषप्रयोग करणे, वारणावत येथे पांडवांना लाक्षागृहात जाळून टाकणे, द्युत क्रीडा खेळायला उद्युक्त करणे इत्यादी सल्ले शकुनी दुर्योधनाला देत असतो. राजाच्या दरबारातील दृष्टपुरुषाचे शकुनी हे मूर्तिमंत प्रतीक आहे. राजकारणात सध्याच्या

(पृष्ठ क्र. ३० वर)

# ऋतूंची शोभायात्रा

*'गाथा सप्तशती' या ग्रंथातील ऋतूंच्या शोभायात्रेची ही झलक... त्यातही ऋतुराज वसंताची ओळख या लेखात देण्यात आली आहे - संपादक*

एक हजार वर्षांपूर्वी पेक्षाही अधिक जुना महाराष्ट्रीयन भाषेतील ग्रंथ म्हणजे 'गाथा सप्तशती!' राजा हाल सातवाहन याने अनेकांच्या चारोळ्या जमवून हा संग्रह संकलित केलेला आहे. प्राकृतातील निवडक अशा पद्यात्मक सुक्तींचा संग्रह सातशे कवितांचा आहे. खरे तर इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात या रसिक राजाने 'गाथाकोश' तयार केला असा इतिहास आहे. कालांतराने 'गाथा सप्तशती' नाव त्या ग्रंथास लाभले. त्यातील ऋतूंच्या शोभायात्रेची ही झलक...त्यातही ऋतुराज वसंताची ओळख...

गाथा सप्तशतीमध्ये मानवी भावभावनांचे सुरेख चित्रण केलेले आहे. त्यातही निसर्ग अधिक आहे. निसर्गाबरोबरच उदात्त प्रेमभावना येते. निसर्गप्रेम हाही इथे हळुवारपणे येणारा विषय आहे. नव्या पिढीला आवडणारे चारोळी काव्य आणि शायरीची नजाकत कशी आहे पाहा -

**फुटू लागले कोंब कोयीला, उलले ते संपुट।**
**अर्ध्या मिटल्या शिंपल्यातूनी, सर्पाचे शेपूट।।**

वर्षाऋतूचा आपल्याला अंदाज येतो. पुढे कवी गातो -

**प्रवासा चाललास प्रियकरा, पाऊस ऋतू ये, पहा।**
**विरह जहर हे कसे साहू मी, जाऊ नका हो, रहा।।**

या साध्या, सरळ काव्यातून जी व्याकुळता हृदयाला भिडते, त्यातील प्रेमभावना वैश्विक आहे. प्रेमाला ऋतूंचे बंधन कधीच नसते! वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत आणि शिशिर अशा सहा ऋतूंचे सहा सोहळे कसे असतात? शहरात वेगळे, गावाकडे वेगळे असतात. शहरात घड्याळाकडे बघून गाडी पकडण्याकडे लक्ष असते, तर गावात घड्याळाशी संबंध ठेवावाच अशी धावपळ नसते. सूर्योदय, सूर्योस्त यावरून दिवस ठरतो. काळोख दाटला की रात्र. एवढाच हिशेब. मोजके प्रहर. समोर उजाड माहरान असो, नाहीतर उभ्या पिकांची हिरवीगार शेतीवाडी असो प्रत्येक ऋतू सांगतो, 'मी आहे.' 'ऋग्वेदा'त ऋतूंना 'वर्षाचा विविध हंगाम' असा अर्थ आहे.

**वसंत हा अनंगमित्र**
**चापबाण घे करी।**
**पल्लवयुक्त ते शराग्र**
**योजी आम्रमंजिरी।।**
**नीट घेई नेम तो**
**कळे न काय योजना।**
**सोडीनाच बाण तो**
**बघून कामिनीजना।।**

नवीन आम्रमोहरांची अग्रे जडविलेले, मागे पालवीची पिसे आणि युवतीजन हे लक्ष्य असलेले मदनबाण, त्याचा सखा वसंतमास सज्ज करवितो, मात्र सोडत नाही.

'वसंतऋतू म्हणजे संवत्सररुपी पक्ष्याचे मस्तक, ग्रीष्म उजवा पंख, वर्षा म्हणजे शेपटी, शरद डावा पंख तर हेमंत हा मध्य' मानला आहे. (तैत्तिरीय उपनिषद : १.१०.४.१)

**चिरेबंद मर्मरी किनारा,**
**नाजूक साजूक बांधा।**
**अशा उसळत्या लावण्याचे**
**शिशिरी सार्थक साधा।।**

---

शहाणा मनुष्य हाच खरा सम्राट. - कार्लाइल

या सार्थकतेच्या गोष्टी साधायला सांगणारे रसिक ऋषिमुनी मोठे जीवनप्रेमी आणि मानवधर्मी होते. वर्षातल्या तीन ऋतूंच्या प्रारंभी तीन यज्ञ करण्याची बुद्धापूर्वी प्रथा होती. बुद्धाने तीच कल्पना वापरून थोडा बदल केला. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा हे तीन ऋतू मानून उन्हाळ्यात वृक्षातली राहावे. अभ्यास करावा. पावसाळ्यात गुंफेत, विहारात राहून ध्यानसाधना करावी आणि हिवाळ्यात पर्णशाला बांधून शिक्षण घ्यावे. साधुजन काय, प्रेमीजन काय – ऋतूंशी नाते जोडतातच. संन्याशी आणि सखेसोबती साऱ्यांनाच वसंतोत्सवाचे अप्रूप! मदन–रतीच्या राज्यात तर तो कायमच असतो –

**कशी बाई मी रुसू प्रियावर,**
**करी न तो मुद्दाम**
**हिवाळ्यातल्या थंडीने**
**तो झाला ग उद्दाम।।**

ज्यांच्यावर रात्र रुसते, त्यांच्यावर आपण कशाला रुसायचे? या प्रश्नाचे उत्तर शोधू नये देऊ नये. गप्प राहावे. ऋतूंचा उत्सव हा त्यांच्या सन्मानार्थ असतो. कोजागिरीचा आनंद शरदऋतूत असतो. 'शारदीय चंद्रकळेचे शीतल विभ्रम मनात काहूर उठवतात. त्यात जर ती रात्र मृगयेची असेल तर अधिकच प्रीत चांदणे खुलते. (हाय! गेले, ते दिन गेले!) तर –

**हिवाळा हाच कमळांना**
**उन्हाळा भासतो भारी।**
**गमे इतरांस शीतल तो**
**कळे ना गुपित संसारी।।**

थंडीचे दोन महिने अंगाची लाहीलाही करतात ना? विसंगत वाटते ना?

**जिव्हाळा लावी ती जीवा**
**हिवाची आग कमळांना।**
**स्वभावे भिन्नता लोकी**
**कळावी ती कशी कोणा?।।**

हेमंत ऋतू कमळांच्या ताटव्यांना उष्ण, तर देशाला थंड असतो, परस्परभिन्न स्वभावाची वस्तुस्थिती खरोखर कोण जाणतो?

फाल्गुनाची तऱ्हा निराळी. होळीचा दिवस. अशुभ, कुविचारांना जाळण्याचा, तर पौषातली तीळ–गुळाची गोडगोड संक्रांती. राग, गैरसमज विसरून एकत्र येण्याचा सण. सारेच लोभसवाणे. थंडीतल्या दिवाळीच्या दिवसांना ज्ञानाच्या प्रकाशाची किनार असते. फराळाची रेलचेल आणि नव्या कपड्यांचे कौतुक. पण एखाद्या गरीब यात्रेकरूची स्थिती मोठी बिकट असते –

**नसे पथारी पांघरूण वा**
**पथिका झोपला तसा।**
**धूसर होई कलांत कलेवर**
**हिमकण पडुनी कसा।।**
**प्रिय रमणी मुखदर्शन घडवी,**
**आठवणी प्रेमळ।**
**अंगी येई ऊब, घर्मजल भिजवी**
**तनू निश्चल।।**

हिवाळ्यात हिमकणांनी धूसर झालेल्या आणि अंगावर वस्त्र नसलेल्या पथिकाला आपल्या पत्नीच्या मुखकमलाची याद येताच घाम फुटला! त्याची थंडीच नाहीशी झाली!! फाल्गुनातल्या मदनोत्सवाची मस्ती कधी अनुभवणार आपण? हा उत्सव इतिहासजमा झाला आहे! फादर 'व्हॅलेंटाईन' ला विसरायला लावणारा हा उत्सव परत सुरू व्हावा!

**ऊब पुरेशी मिळेना, केली**
**जरी अंगाची जुडी।**
**हिवाळ्यात या अशा प्रियेचा**
**आठव ये घडीघडी।।**

गावाकडे काटक्याकुटक्या गोळा करून शेकोटी करण्यात गर्क झालेल्या आणि थंडीने काकडून गेलेल्या पोरांना त्या शेकोटीचा विस्तव कसा तुनूमुनू जळतो,

जितके शहाणपण जास्त, तितके दुःखही जास्त. – ओल्ड टेस्टामेंट

अर्थात ऊब देत नाही, तशी एकल्या प्रेमवेड्या जीवाची अवस्था होते. त्यात नशीबही जोरावर असावे लागते.

**किती वाटतसे जरी हे असले**
**परी काळ नसे अनुकूल मला।**
**छळते बघ हीच, तनुलतिका**
**थरकापवी ही हेमंतकला।।**

प्रेम कितीही लपविले तरी व्याकुळ प्रेमबावऱ्या जीवांच्या वागण्याने ते इतरांच्या लक्षात येतेच! 'लाख छुपाओ। छूप न सकेगा। राज इतना गहरा। दिल की बात बता देता है। असली नकली चेहरा।।' यात सारे आले.

प्राचीन काळी ऋतुगमनासाठी स्वतंत्र रतिमंदिर असे. 'जुने जाऊ द्या मरणालागुनी' असे म्हटले तरी चांगले. ते हवेहवेसे वाटतेच

**उंच-सखल सारेच सारखे**
**भासे वर्षाकाळी।**
**खाचखळग्या एकपातळी**
**रातही काळीकाळी।।**

अज्ञानाच्या, गैरसमजाच्या काळोख्यात जगणारे आपण 'आयटी'च्या गप्पा मारतो. विकासाचा वाढता आलेख दाखवतो. संस्कृतीचा हात सोडल्यावर बाह्यप्रगती होते, आत्मउन्नतीचे काय? निदान 'वनवास' तरी साधवा.

जिथले दाट कदंबवृक्ष फुलांनी डवरले आहेत, शिलातळे पावसाने धुऊन स्वच्छ झाली आहेत, मोर हरखून गेलेत खळखळ आवाज करीत झरे वाहाताहेत, अशी डोंगरातली गावे कशी उत्साहाने ओसंडून वाहातात, नाही?

याउलट, ग्रीष्म! विहिरी आटविणारा, लताकुंजांत पालवी निर्माण करणारा, भेटीचे संकेत अनुकूल करणारा. सौभाग्यसुवर्णाच्या कसोटीस उतरणारा, ग्रीष्मकाल प्रकृतीला रोडावणारा... आरशात पाहून रडूच फुटते. वियोगकाल असाच असतो ना? (वजन कमी करणारा?)

वसंत अवतरतो तेव्हा विशाल कमलांच्या मंदिरातील मधाने आनंदित झालेली भ्रमरांची गर्दी ही चैत्रमासाच्या सौंदर्यलक्ष्मीच्या काळ्याभोर रत्नांच्या कमरपट्ट्याप्रमाणे रुमझुमत येतो. त्या उष्णतेत जलक्रीडा करावीशी वाटते.

**मागील आठवणी मीलनातही का सतावतात?**
**जाळूनीही मालतीसुमन।**
**शिशिर शमेना क्रूर।**
**कुंद देखणा सुगंधहीन।**
**फुलवील तो मग्रूर।।**

मालतीच्या फुलांना कोळपून शिशिर अवतरला होता, तेव्हा त्याला गुणशून्य कुंदफुलांचे ऐश्वर्य म्हणजे बहर भरास आला होता. वसंत अक्षरशः जाळून गेला, तोही ऐन सुखातच स्मरतो. तेव्हाची मनःस्थिती नोंद केलेली गुणगुणाविशी का वाटते? ही विसंगती दुःखाशिवाय काही देते का?

**विरह-जहर करी कहर**
**सुगंध बहर वसंतफुलांचा।**
**रक्तसडा शिंपला जणू**
**की फुटलेल्या हृदयांचा।।**

गुलमोहराच्या फुलांनी रंगलेली जमीन आठवते का? जपानमध्ये 'चेरीब्लॉसम' हा एक राष्ट्रीय उत्सावाप्रमाणे साजरा केला जातो. प्रेमीजीवांना जीव की प्यार हा मोसम वेड लावतो -

**उन्मादक या वसंतसमयी**
**नसे असंभव काही।**
**भवती मकरंदगंध दरवळे**
**तरी ती चळली नाही।।**

एवढा संयम ठेवणे कठीणच! तरीही कधी कधी मन मारावे लागते ...

**जा, जा, आता घरी परतुनी**

शहापणपण हीच सुज्ञांची संपत्ती. - डब्ल्यू. जी. बेनहॅम

**कांताविण एकान्ती।**
**कसा भरवसा मनी धरावा**
**मोहमयी या राती।।**

मोहमायेच्या संसारात रंगण्याचाही एक मोसम असतो. कवी म्हणतात, 'या जगातील रसगंधांवरच संतोष मानू नकोस. दिन रात्रीच्या चक्रात अडकू नकोस.' कळते, पण वळते कुठे?

क्षणभर का होईना, जो हृदयातून नाहीसा होतो त्याचीच आठवण राहते, ज्याची आठवण मुद्दाम करावी लागते ते प्रेम निराधार होऊन संपून जाते का? प्रेमाचे शास्त्रच अनाकलनीय. असे म्हणतात की, भेट घडली नाही तर स्त्रियांचे प्रेम आपोआप सुकून जाते. अतिसंपर्कामुळे हलक्या माणसाचे प्रेम उडून जाते. दुष्ट लोकांच्या लावालावीमुळे मूर्खांचे प्रेम विरून जाते, तसेच दुर्जनांचेही प्रेम क्षणिक असते.

पण शाश्वत प्रेम सज्जनांचे असते. ते चिरंतन राहते. मीलनसौक्ष्य मिळो, न मिळो! असो. आता आपण वळूया शरदाकडे! एक प्रीतबावरी आपल्या सखीला सांगते आहे –

**रानात ऊब लाभे**
**थंडीत लाकडांची।**
**गावात आगटी ही**
**शेकावया तृणाची।।**
**पांथस त्या सये ग**
**शरदात ऊब देई।**
**नगरात आज त्याचा**
**हे हीव जीव घेई।।**
**नाहीच पांघराया,**
**छळतो पुरा हिवाळा।**
**दावील कोण बाई**
**पथिकास त्या जिव्हाळा।।**
**आलिंगनात शेजे**
**तो देह पामराचा।**
**काढील खास थंडी**
**उष्मा पयोधरांचा।।**

रानात फांद्या घासून पेटलेल्या अग्नीने आणि गावात शेकोटीने या पथिकाचे रक्षण केले. तो शहरात राहू लागला, तेव्हा मात्र जणू सूडबुद्धीने त्याला हैराण करायला सुरुवात केली. 'दर्द' या शायरने म्हटले आहे, 'जिन्दगी है, या कोई तुफान है। हम तो इस जीने के हाथों मर चले।।' ऐन तारुण्यात असा विपरीत अनुभव आला तर उर्वरीत आयुष्याचे काय? 'तो' हताश होतो, तशीच तीसुद्धा –

**आधीच वियोगिनी मी**
**गर्जित पहिलेच गर्जतो मेघ।**
**विधिलिखिते ती लिहिते**
**बिजली, क्षितिजी पुसे न ती रेघ।।**
**आठव देत सुखाचा**
**वाजत भेरी गंभीर संकेता।**
**पूर्वापराध जाणुनी अपराधी**
**तो वधस्थली नेता।।**

पूर्वकाळातील सुखद स्मृती आठवताना अचानक आभाळ भरून येते, वीज चमकते, ढगांचा गडगडाट अस्वस्थ करतो. आता पुन्हा त्याच्यापुढे हार पत्करण्याचे दिवस आले, या पराभवाच्या कल्पनेने अंग मोहरून उठते! बहरोद्यान आणि तारुण्यकाळ गाफील राहीलच कसे?

मित्रहो, ही काही उदाहरणादाखल ऋतूंची शोभायात्रा आहे. जुन्यातले सोने शोधणारी. तशीच ती न संपणारी. या यात्रेत सामील होण्यासाठी मूळ ग्रंथ 'गाथासप्तशती' वाचायलाच हवा!

**– अरविन्द दोडे**
भ्रमणध्वनी : ९८१९१९५५९२

•••

# फ्रेंच राज्यक्रांती चिरायू होवो!

*१७८९ ते १७९९ ह्या कालावधीत फ्रान्समध्ये झालेल्या राज्यक्रांतीविषयी माहिती देणारा लेख – संपादक*

१४ जुलै १७८९ हा दिवस जगाच्या इतिहासातील व प्रामुख्याने फ्रान्स ह्या देशाच्या इतिहासातील महत्त्वाचा दिवस मानला जातो. ह्याच दिवशी फ्रान्समधील ऐतिहासिक क्रांतीची सुरुवात झाली व या देशातील बुरबॉन (Bourbon) राजघराण्याच्या राजसत्तेचा अस्त झाला. जेव्हा फ्रेंच राज्यक्रांतीला सुरुवात झाली तेव्हा सोळावा लुई हा फ्रान्सचा राजा होता. याचाच अर्थ असा की, फ्रेंच राज्यक्रांतीचा रोख सोळाव्या लुईच्या राज्यकारभाराविरुद्धच होता. इतिहासकार म्हणतात की, सोळावा लुई स्वभावाने व मनाने चांगली व्यक्ती होती. मात्र त्याच्या निष्क्रियतेमुळे व त्याच्या सल्लागारांनी चुकीचे सल्ले दिल्यामुळे त्याच्या काळात क्रांती झाली. असे म्हटले जाते की, सोळाव्या लुईला वाचनाची देखील आवड होती. अशा सुसंस्कृत व सुस्वभावी राजाच्या काळात क्रांती घडावी म्हणजे एक प्रकारे त्या राजाचे दुर्दैव होय असे म्हणावे लागेल. परंतु १८ व्या शतकातील फ्रान्समधील राजकीय, सामाजिक व आर्थिक स्थिती पाहिली असता असे लक्षात येते की, ही क्रांती होणे कोणीही टाळू शकत नव्हते. किंबहुना फ्रान्समधील स्थिती सुधारण्यासाठी ह्या क्रांतीची आवश्यकता होती असे म्हणणे वावगे ठरू नये.

तसे पाहता सोळाव्या लुईचा पूर्वज चौदावा लुई ह्याच्या काळापासूनच फ्रान्समधील आर्थिक व सामाजिक स्थिती बिकट होण्यास सुरुवात झाली असे म्हणणे संयुक्तीक ठरावे. फ्रान्सचा राजकीय इतिहास पाहता आपल्या लक्षात येते की, ह्या देशात साधारणतः इसवी सनाच्या ८ व्या शतकापासून पुढे शार्लमन (Charlemagne), फिलीप ऑगस्टस् (Philip Augustus), दुसरा हेन्री (Henry) असे कर्तबगार राजे होऊन गेले. ह्या राजांनी आपापल्या काळात फ्रान्सच्या साम्राज्याचा विस्तार करण्याचा व फ्रान्सला युरोपमधील एक महत्त्वाची सत्ता बनविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आढळतो. तेराव्या लुईच्या पश्चात त्याचा मुलगा चौदावा लुई हा फ्रान्सचा राजा बनला. चौदावा लुई अतिशय लहान असताना १६४३ च्या आसपास राजा झाला. तेव्हा त्याचे वय अवघे पाच वर्षाचे होते. त्यामुळे त्याच्यावतीने पंतप्रधान कार्डिनल माझरँ (Cardinal Mazarin) हा राज्यकारभार पाहात असे. माझरँ हा इटालियन वंशाचा होता व त्याचे मूळ नाव ग्युलियो राईमोंडो माझरिनो (Giulio Raimondo Mazzarino) असे होते व त्याचा जन्म नेपल्स राज्यातील पेस्किना (Pescina) ह्या ठिकाणी झाला होता. मात्र तो इटलीची राजधानी रोम येथे वाढला होता. माझरँ ह्याच्या काळात युरोपमध्ये फ्रान्सचे राजकीय वर्चस्व प्रस्थापित झाले. १६६१ साली माझरँ ह्याचा मृत्यू झाला व चौदाव्या लुईच्या प्रदीर्घ राजकीय कारकीर्दीची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. कारण माझरँ हयात असेपर्यंत चौदाव्या लुईला अनेकदा त्याच्या छायेखालीच वावरावे लागत असे. अर्थात, तेव्हा त्याचे वयदेखील लहान होते. १६६१ साली जेव्हा चौदाव्या लुईच्या हातात पूर्ण राजसत्ता आली तेव्हा त्याचे वय २३ वर्षे होते. याचा अर्थ अतिशय तारुण्यात तो सिंहासनावर खऱ्या अर्थाने आरूढ झाला. चौदाव्या लुईचा दरबार म्हणजे संपूर्ण युरोपभर चर्चेचा विषय होता व त्याविषयी

युरोपमधील इतर राजांच्या मनात आकर्षण होते असे अभ्यासक म्हणतात. चौदाव्या लुईने दरबारात सुरू केलेल्या अनेक परंपरा व शिष्टाचार संपूर्ण युरोपमध्ये मोठ्या प्रमाणात पाळले जात असत. असे म्हटले जाते की, चौदाव्या लुईच्या दरबारात विनोदाला थारा नव्हता व तो स्वतः कुणाचीही गंमत वा चेष्टा करत नसे.

चौदावा लुई इतिहासात 'सन किंग' म्हणून देखील प्रसिद्ध आहे. हाच चौदावा लुई 'आय एम् द स्टेट' (I am the State) म्हणत असे. ह्या इंग्रजी वाक्याचा अर्थ 'मी म्हणजेच राज्य' असा होतो. ह्या एका वाक्यावरून तत्कालीन फ्रान्समधील राजसत्ता राजाच्या हातात किती मोठ्या प्रमाणात एकवटलेली होती हे निदर्शनास येते. चौदाव्या लुईची कारकीर्द युरोपच्या इतिहासातील सर्वात मोठी कारकीर्द समजली जाते. त्याने ७२ वर्षे व ११० दिवस एवढा प्रदीर्घ काळ फ्रान्सची राजसत्ता उपभोगली. चौदाव्या लुईच्या काळात फ्रान्सची राजधानी पॅरिस येथून व्हर्सायच्या राजवाड्यात हलविण्यात आली. व्हर्साय हे ठिकाण वा गाव पॅरीसपासून साधारणतः २० मैल एवढ्या अंतरावर आहे. हा राजवाडा म्हणजे संपूर्ण युरोपमधील राजघराण्यांचा आकर्षणाचा विषय होता. ह्या राजवाड्याचे मुख्य आकर्षण म्हणजे चौदाव्या लुईने ह्या राजवाड्यात बांधलेला काचमहाल वा शिशमहाल होय. ह्याला इंग्रजीत 'हॉल ऑफ मिरर' (Hall of Mirror) असे म्हणतात. हा महाल बांधण्यासाठी फार मोठ्या प्रमाणात पैसा खर्च करण्यात आला होता. त्यामुळे ह्या राजवाड्याला 'द पॅलेस ऑफ मिरर्स' (The Palace of Mirrors) म्हणजेच 'काच महाल' असे देखील म्हटले जाई. ह्या व्हर्सायमध्येच सरदार मंडळींना एकत्र ठेवून चौदाव्या लुईने त्यांना खुष ठेवले. तेव्हापासूनच श्रीमंत सरदार व उच्च श्रेणीतील चर्चचे अधिकारी (उदाहरणार्थ आर्चबिशप, बिशप, ॲबॉट इ.) यांना राजासोबत व्हर्सायमध्ये राहण्याचा व जीवनाचा मनमुराद आनंद लुटण्याचा व मौजमजेत राहण्याचा पायंडा पडला असे म्हणणे वावगे ठरू नये. ह्या वर्गाने तसे राहण्यास काहीच कारण नव्हते. मात्र ही मौजमजा सामान्य माणसावर लादलेल्या अमानुष करांमधून जमा केलेल्या पैशातून होत असे. त्यामुळे फ्रान्समधील सर्वसामान्यांचा वर्ग एकंदरीतच नाखुश होता व ह्याचाच भडका १७८९ मध्ये उडून क्रांतीला सुरुवात झाली. चौदाव्या लुईच्या ह्या व्हर्सायच्या राजवाड्याबाबत व तो कशाप्रकारे बांधला गेला, त्यासाठी कोठून व कुठल्या प्रकारच्या विविध वस्तु मागविण्यात आल्या व तो एकंदरीत किती टप्प्यांत बांधला गेला हे सर्व सांगण्यासाठी एक स्वतंत्र लेख लिहावा लागेल. असो. तर एकंदरीतच चौदावा लुई हे असे प्रकरण होते की, ज्यास भव्य-दिव्य व सुंदर महाल, उंची कपडे व महागडे दागदागिने वापरण्याचा छंद नव्हे शोक होता. राजाच्या ह्या सगळ्या चैनी प्रजाजनांकडून मोठ्या प्रमाणावर कररूपाने उकळल्या गेलेल्या पैशांवर होत होत्या. अगोदर नमूद केल्याप्रमाणे चौदावा लुई शिष्टाचारांचा जिवंत पुतळा होता. तो त्याच्याजवळून वा समोरून एखादी स्त्री गेली असता आपल्या डोळ्यावरची टोपी काढून त्या स्त्रीस अभिवादन करीत असे. चौदाव्या लुईच्या अतिशय आरामदायी जीवनाचे एक उदाहरण म्हणजे त्याने दरबारात बसवून घेतलेले सिंहासन होय. असे म्हटले जाते की, ह्या सिंहासनाची अशी रचना केलेली होती की, दरबार चालू असताना राजाला नैसर्गिक विधीची कळ लागल्यास ह्या सिंहासनाचे रुपांतर कमोडमध्ये होत असे. भर दरबारात राजा आपला 'हा' विधी उरकून घेत असे व पुनश्च वा त्या पश्चात दरबाराचे कामकाज पुन्हा सुरू करत असे. चौदाव्या लुईच्या ह्या 'विशेष' सिंहासनाविषयीची माहिती टेकचंद सोनावणे लिखीत 'लोकसत्ता' ह्या लोकप्रिय मराठी वृत्तपत्राच्या रविवारी निघणाऱ्या 'लोकरंग' ह्या पुरवणीतील एका लेखात आली होती. चौदाव्या लुईने आपल्या काळात हॉलंड,

उन्हाळ्यात जे मिळते, ते हिवाळ्यात खलास होते. - जर्मन म्हण.

इंग्लंड या देशांशी युद्धे केली व हरला. त्याने अनेक किल्ले व इमारती बांधल्या. ह्या सर्व उधळपट्टीमुळे चौदाव्या लुईच्या काळातच फ्रान्सच्या आर्थिक स्थितीला घरघर लागण्यास सुरुवात झाली व राजाची तिजोरी रिती झाल्यावर सामान्य जनतेवर अजून जास्त प्रमाणात करांचा बोजा टाकणे व व्याजाने कर्ज काढून राजवाड्याचा व एकंदरीतच शाही कुटुंबाचा खर्च भागवणे ह्या अनिष्ट गोष्टींचा पायंडा पडला असे म्हणणे वावगे ठरू नये. अशा ह्या चौदाव्या लुईचा मृत्यू झाल्यानंतर लोकांनी त्याच्या शवपेटीवर दगड मारले होते हे वाचल्यावर वाचकांना आश्चर्य वाटू नये.

चौदाव्या लुईनंतर त्याचा पणतू पंधरावा लुई हा फ्रान्सचा राजा बनला. चौदाव्या लुईच्या मृत्यूसमयी पंधराव्या लुईचे वय अवघे पाच वर्षांचे होते. त्यामुळे १७२३ पर्यंत पंधराव्या लुईच्यावतीने दुसरा फिलीफ फ्रान्सचा राज्यकारभार सांभाळत होता. दुसरा फिलीफ हा चौदाव्या लुईचा लहान भाऊ पहिला फिलीफ याचा मुलगा होता. ह्याच्याच काळात युरोपच्या इतिहासातील 'सेव्हन इयर्स वॉर' (Seven Year's War) म्हणजेच सात वर्षांचे युद्ध लढले गेले. ह्या युद्धाची सांगता १७६३ मध्ये झाली व फ्रान्सला ग्रेट ब्रिटनकडून ह्या युद्धात हार पत्करावी लागली. एवढेच नव्हे तर उत्तर अमेरिकेतील व भारतातील बरेच प्रदेश फ्रान्सला ग्रेट ब्रिटनला द्यावे लागले. अनेक अभ्यासक असे मानतात की, पंधराव्या लुईच्या अनेक निर्णयांमुळे फ्रान्सचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मात्र काहींच्या मते १७८९ च्या क्रांतीचे खापर त्याच्यावर फोडण्यासाठी काही लोकांनी तो जाणूनबुजून केलेला अपप्रचार होता असे मानतात. काहीही असले तरी पंधराव्या लुईच्या काळात सुद्धा पैशाची बेसुमार उधळपट्टी चालू होती असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. काहीही असले तरी पंधरावा लुई हा त्याच्या प्रजाजनांमध्ये लोकप्रिय होता असे जाणवते. कारण त्याला 'वेल बिलव्हड्' (Well Beloved) ही पदवी देण्यात आली होती. एकदा पंधरावा लुई रणांगणावर आजारी पडला असता तो बरा व्हावा यासाठी लोकांनी प्रार्थना केल्याचे निदर्शनास येते. पंधराव्या लुईचे जीवन बऱ्यापैकी स्वैराचारी होते व त्याची अनेक अंगवस्त्रे (प्रेमिका) होती असे दाखले आपणास सापडतात. अशा ह्या उधळपट्टी करणाऱ्या पण प्रजेत लोकप्रिय असणाऱ्या पंधराव्या लुईचे निधन १७७४ साली झाले.

पंधराव्या लुई नंतर, सोळावा लुई फ्रान्सचा सम्राट बनला. त्याचा जन्म २३ ऑगस्ट १७५४ रोजी व्हर्सायमध्ये झाला होता व तो पंधराव्या लुईचा नातू होता. ह्याच सोळाव्या लुईच्या काळात अगोदर नमूद केल्याप्रमाणे १७८९ साली फ्रेंच राज्यक्रांतीला सुरुवात झाली. सोळाव्या लुईच्या व्यक्तिमत्त्वात व एकंदरीतच राजवटीत काही दोष असले तरी त्याचे काही गुण वाखाणण्याजोगे होते असे म्हणणे वावगे ठरू नये. फ्रेंच राज्यक्रांतीच्या घटनांचा आढावा घेताना आपल्या लक्षात येते की, सोळाव्या लुईने राजवाड्यावर चालून येणाऱ्या लोकांवर आपल्या सैनिकांना त्यांच्यावर कारवाई करण्यापासून अनेकदा रोखले होते. ह्यावरून सोळावा लुई अगदीच अत्याचारी राजा नव्हता असे निदर्शनास येते. कारण राजाने वेळीच हल्लेखोर लोकांना सैनिकांच्या सहाय्याने आळा घातला असता तर गोष्टी फ्रेंच राज्यक्रांतीपर्यंत गेल्या नसत्या असे काही अभ्यासक मानतात. सोळाव्या लुईला जेव्हा फ्रान्समधून पलायन करण्याचा सल्ला देण्यात आला तेव्हा सुरुवातीस तरी त्याचा ह्या गोष्टीला विरोध होता व तो स्वतःशीच 'पळपुटा राजा' अशा आशयाचे वाक्य पुटपुटला होता.

इसवी सन १७८८ पासून फ्रेंच राज्यक्रांतीला कारणीभूत घटना वेगाने घडत गेल्या असे म्हणणे वावगे ठरू नये. १७८८ च्या ऑगस्ट महिन्यापासूनच असे निदर्शनास येऊ लागले की, राज्याची आर्थिक स्थिती

डबघाईला आलेली असून शाही तिजोरीत खडखडाट आहे. त्यामुळेच तत्कालीन अर्थमंत्री ब्रिने (Brienne) याने १६१४ सालापासून ज्या इस्टेट्स जनरलची (Estate General) बैठक बोलविण्यात आली नव्हती ती बैठक ५ मे १७८९ या दिवशी बोलाविण्यात यावी अशी सूचना केली. फ्रेंचमध्ये 'इस्टेट' ह्या शब्दाचा अर्थ साधारणतः 'वर्ग' असा होतो. फ्रान्सच्या समाजाचे विभाजन त्याकाळात तीन वर्गांमध्ये होत असे. हे तीन वर्ग म्हणजे फर्स्ट इस्टेट (First Estate), सेकंड इस्टेट (Second Estate) व थर्ड इस्टेट (Third Estate) हे होत. फर्स्ट इस्टेट ह्या वर्गात चर्चच्या अतिउच्च अशा आर्चबिशप, बिशप, ॲबॉट इत्यादी पदाधिकाऱ्यांचा समावेश होत असे. फ्रान्समधील जवळजवळ एक पंचमांश जमीन ही चर्चच्या मालकीची होती. फ्रान्समधील चर्च सामान्य जनतेकडून 'टीद' (Tithe) नामक कर वसूल करीत असे. मात्र, चर्चच्या उच्चपदाधिकाऱ्यांवर तसेच चर्चच्या एकूणच मिळकतीवर राजा वा शासन कुठल्याही प्रकारचा कर आकारत नसे. याचाच अर्थ असा की, चर्चला म्हणजेच फर्स्ट इस्टेटमध्ये समाविष्ट असलेल्या व्यक्तींकडून शासन कुठलाही कर गोळा करत नसे. ह्या वर्गातील लोकांचे उत्पन्न भरपूर होते. मात्र, त्यावर कर आकारला न गेल्याने शासनाच्या तिजोरीतील मिळकतीवर त्याचा निश्चितच वाईट परिणाम झाला होता. जर ह्या वर्गाकडून राजाने कर गोळा केला असता तर कदाचित फ्रान्सच्या राजांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागले नसते. ह्या वर्गाला कर भरण्याची इच्छा नव्हती व राजा व त्याच्या मंत्रीमंडळामध्ये व सल्लागारांमध्ये ह्या वर्गावर कर लादून तो गोळा करण्याची इच्छाशक्ती नव्हती. राजाच्या दरबारातील अनेकजणांचा फर्स्ट इस्टेट तसेच सेकंड इस्टेटला पूर्ण पाठिंबा होता व ह्या दोन वर्गांना शासनाने व पर्यायाने राजाने कर देण्यापासून वगळावे अशी त्यांची भूमिका होती. सोळाव्या लुईची राणी मारी अन्तवायनेत (Marie Antoinette) हिला देखील ह्या दोन वर्गांविषयी सहानुभूती होती असे म्हणतात.

फ्रेंच समाजातील सेकंड इस्टेटमध्ये सरदारांचा वा सरंजामदारांचा समावेश होता. फ्रेंच राज्यक्रांतीच्या पूर्वसंध्येवर अशा सरदार घराण्याची ऐंशी हजार कुटुंबे होती असे म्हटले जाते. ह्या सरदारांच्या मालकीच्या संपूर्ण देशभर शेकडो एकर जमिनी होत्या. त्या जमिनी कसण्यासाठी त्यांनी शेतकऱ्यांना दिलेल्या होत्या. ह्यातून सरदारांना भरमसाट उत्पन्न मिळत असे. परंतु फर्स्ट इस्टेट प्रमाणेच ह्या वर्गातील लोकांनासुद्धा शासनास कर देण्यापासून वगळलेले होते. म्हणजेच त्यांच्या उत्पन्नावर शासन कर आकारत नसे. तसेच त्यांना इतर विविध करांतून सुद्धा सवलत देण्यात आली होती. ह्या वर्गातील सरदारांना शासनाकडून विविध फायदे तर मिळतच होते; सोबतच त्यांना प्रशासनातील चांगली व उच्च पदे देण्यात येत असत. हे सरदार ग्रामीण भागातील जनतेकडून वेगवेगळ्या प्रकारचे कर गोळा करत असत. यात त्यांच्या जमिनीतून जाणारा पूल वा रस्ता वापरावयाचा असेल तर त्यावर 'टोल' (Toll) नामक कर, त्यांच्याकडून धान्य दळून घेण्यासाठी द्यावयाचा कर, त्यांच्याकडून मद्य विकत घेऊन त्यावर द्यावयाचा कर इत्यादी करांचा समावेश होत असे. अशाप्रकारे फ्रान्समधील ग्रामीण जनता व शेतकरी त्यांच्या उत्पन्नाच्या जवळ जवळ ८६% एवढा टक्के भाग राजा, फर्स्ट इस्टेट व सेकंड इस्टेट यांना विविध करांच्या रुपात देत असे. त्यामुळे त्याकाळात सर्वात बिकट अवस्था असेल तर ती शेतकऱ्यांची होती. ते अक्षरशः गरिबी व दारिद्र्यात पिचत होते. मध्ययुगात ह्या स्वरुपाची शेतकऱ्यांची व ग्रामीण भागातील लोकांची स्थिती कमी-जास्त प्रमाणात युरोपमधील सर्वच देशांमध्ये सारखीच होती असे म्हणणे वावगे ठरू नये. अगदी ग्रेट ब्रिटनसारख्या देशामध्ये अशी स्थिती होती व त्यावर आधारीत 'रॉबीनहूड द मेन इन टाईटस्' हा इंग्रजी भाषेतील विनोदी चित्रपट देखील

कोणीही आपले इच्छास्वातंत्र्य हिरावून घेऊ शकत नाही. - एपिटेक्टस

बनलेला आहे. रॉबीनहूड ही इंग्लंडच्या लोकपरंपरेतील एक गरिबांना व उपेक्षितांना न्याय देणारी व्यक्तिरेखा म्हणून ओळखली जाते. तर ह्या चित्रपटात असा एक विनोदी प्रसंग आहे की, रॉबीनहूड आपल्या सवंगड्यांसह जंगलातून जात आहे, ह्या जंगलावर राजाची मालकी आहे व एके ठिकाणी ह्या जंगलातून छोटा झरा वाहात आहे व तो झरा ओलांडून जाण्यासाठी एक लहानसा पूल बांधण्यात आलेला आहे, असे ह्या चित्रपटात दाखविण्यात आले आहे. रॉबिनहूड जेव्हा त्या पुलाजवळ पोहोचतो तेव्हा त्या पुलावर काही शिपाई असतात व ते रॉबिनहूडला तो झरा ओलांडण्यासाठी पुलाचाच वापर करावा व त्यासाठी 'टोल' हा कर द्यावा असे सुचवितात. ह्या शिपायांना रॉबिनहूड म्हणतो की, 'मी हा झरा तर उडी मारून देखील पार करू शकतो. त्यासाठी राजाने वा सरदारांनी बांधलेल्या पुलाचाच वापर करण्याची काय गरज आहे ? रॉबीनहूडचे हे म्हणणे ऐकल्यावर शिपाई म्हणतात, 'नाही तुम्ही तसे करू शकत नाही. कारण राजाचे आदेश आहेत की, येथून जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने हा झरा ओलांडण्यासाठी ह्या पुलाचाच वापर करावा व त्यासाठी 'टोल' भरावा. यातून फक्त राजा, उमराव व सरंजामदारांनाच सूट आहे. सामान्य माणसाला यातून अजिबात सूट नाही' तर ह्या चित्रपटातील हा एक प्रसंग मध्ययुगीन काळात उमराव व राजांकडून सामान्यजनांचे होणारे शोषण अतिशय ठळकपणे आपल्यासमोर मांडतो. क्रांतीच्या उंबरठ्यावर असणाऱ्या फ्रान्समध्ये देखील शेतकरी, कामगार व इतर कष्टकरी जनतेवर अशाच प्रकारे विविध करांचा बोजा टाकण्यात आला होता. त्यामुळे फ्रान्समधील थर्ड इस्टेट (Third Estate) मध्ये मोडणाऱ्या ह्या लोकांचा तत्कालीन राजकीय व्यवस्था व त्यांची करप्रणाली यावर फार मोठ्या प्रमाणात राग होता.

थर्ड इस्टेटवर करांचा अनाठायी बोजा तर पडलेला होताच. मात्र त्यांच्यासाठी शासन कुठल्याही प्रकारचे कल्याणकारी काम करत नव्हते. उमराव व सरदार लोक तर शिकारीसाठी निघाल्यावर शेतकऱ्यांच्या शेतीतील उभ्या पीकाची नासधूस करीत असत. ह्या सर्व कारणांमुळे थर्ड इस्टेटमधील शेतकरी, कलाकार, कामगार, व्यापारी, वकील, शिक्षक, डॉक्टर इत्यादींचा राजावर व शासनावर रोष होता. १७८९ ची क्रांती घडवून आणण्यासाठी ह्याच वर्गातील लोकांनी पुढाकार घेतल्याचे आपल्या निदर्शनास येते. ह्या परिस्थितीत भर म्हणून १७८० च्या दशकात फ्रान्समध्ये अन्नधान्याचा मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाला. त्यामुळे राजाने सामान्यजनांना 'ब्रेड' चा पुरवठा करावा यासाठी महिलांनी मोर्चे काढलेले आढळतात. त्याचवेळी फ्रान्सची राणी मारी आन्तवायनेत हिने 'जर ब्रेड नसेल तर केक खा' अशा स्वरुपाचे उद्‌गार काढले होते असे इतिहासकार म्हणतात. त्यामुळे सामान्यजन अजूनच जास्त प्रमाणात प्रक्षुब्ध झाले व राजाविरुद्ध असंतोष पसरला.

मारी आन्तवायनेत हे देखील अजब व्यक्तिमत्त्व होते. ती ऑस्ट्रीयाच्या हॅप्सबर्ग (Habsburg) राजघराण्यातील राजकन्या होती. फ्रान्सच्या बुरबाँ (बुरबाँन असेदेखील म्हणतात) राजघराणे व ऑस्ट्रीयाचे हॅप्सबर्ग राजघराणे यांच्यात चांगले संबंध प्रस्थापित व्हावेत यासाठी फ्रान्सचा राजा सोळावा लुई व मारी आन्तवायनेत यांचे लग्न जुळवून आणण्यात आले होते. सोळाव्या लुईला लग्नाच्या वेळेस शारीरिक व्यंग असल्याने ह्या जोडप्याला लग्नानंतर जवळ जवळ सात वर्षे अपत्य झाले नव्हते. शेवटी राजाने स्वतःवर एक शस्त्रक्रिया करून घ्यावी असे सुचविण्यात आले. एकदा राजा शस्त्रकियेसाठी तयार झाला परंतु शस्त्रक्रिया कक्षातील विविध अवजारे बघून तो घाबरला व त्याने स्वतःवर शस्त्रक्रिया करून घेण्यास नकार दिला. मात्र कालांतराने त्याच्या मेहुण्याच्या सांगण्यावरून त्याने

शस्त्रक्रिया करून घेतली व त्यानंतर त्याला अपत्य झाले. परंतु लवकर अपत्ये न झाल्यामुळे मारीला आपल्याजवळ मित्रांचा कोंडावळा जमविणे, पत्ते खेळणे इत्यादी गोष्टींची आवड निर्माण झाली होती. राणीचे परपुरुषासोबत संबंध असावेत अशी देखील अफवा त्याकाळात पसरली होती. त्यामुळे राणीच्या आईने तिला आपल्या माहेरचे व ऑस्ट्रीयाच्या राजघराण्याचे नाव बदनाम होईल अशा प्रकारचे कुठलेही कृत्य करू नये असे बजावले होते. यावर राणीने आपल्या बहिणीला पत्र पाठवून उत्तर दिले होते की, 'आपल्या दोघींच्याही शरीरात आपल्या आईचे रक्त वाहात आहे. त्यामुळे मी आपल्या माहेरच्या लोकांची बदनामी होईल अशा स्वरुपाचे कुठलेही कृत्य करणार नाही किंबहुना करूच शकत नाही.' असे असले तरी नंतरच्या काळात काऊंट फेर्सेन ह्या स्वीडीश वंशाच्या व्यक्तीबरोबर राणीचे जरा जास्तच जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित झाले होते असे म्हणतात. परंतु त्यांनी आपल्या मैत्रीची वा संबंधांची एक विशिष्ट मर्यादा कधीच ओलांडली नाही असे देखील म्हटले जाते. शेवटी १७९१ साली जेव्हा सोळाव्या लुईने देशातून पलायन करण्याचे ठरविले तेव्हा ह्याच फेर्सेनने राजाच्या, राणीच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या पलायनाची संपूर्ण योजना आखली होती. तेव्हा राजा फेर्सेनला म्हणाला होता की, 'मी तुझे हे उपकार व मदत कधीच विसरणार नाही'. यावेळी राणीच्या डोळ्यात अश्रू आले होते.

फ्रेंच राज्यक्रांतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ही १७८९ ते १७९९ क्रांती अशी जवळ जवळ दहा वर्षे चालू होती व १७८९ ते १७९९ ह्या दहा वर्षांच्या कालावधीत क्रांतीने व जनतेने विविध टप्पे अनुभवले. फ्रेंच राज्यक्रांतीची सुरुवात खऱ्या अर्थाने १४ जुलै १७८९ मध्ये झाली असे इतिहासकारांचे मत आहे. ह्या दिवशी रागावलेल्या जनतेने फ्रेंच राजाच्या अमर्याद सत्तेचे प्रतीक असलेल्या व सामान्य माणसांची गळचेपी करून त्यांना डांबण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या बास्तील (Bastille) ह्या तुरुंगावर हल्ला चढवला व तो तुरुंग अक्षरशः जमीनदोस्त केला व तेथील कैद्यांना पळून जाण्यासाठी वाट मोकळी करून दिली. ह्या घटनेमुळे संपूर्ण फ्रान्सभर सामान्य जनतेने जल्लोष साजरा केला. एवढेच काय फ्रेंचांप्रमाणेच रशियन, डॅनिश, जर्मन, इंग्लिश, डच इत्यादी लोकांनीदेखील बास्तीलच्या पाडावामुळे आनंदोत्सव साजरा केला अशा नोंदी आपणास सापडतात.

फ्रेंच राज्यक्रांतीचा निदान सुरुवातीच्या काळात तरी मूळ उद्देश राजाला पूर्णतः पदच्युत करावे असा नव्हता. राजाविषयी जनतेला थोड्याफार प्रमाणात तरी सहानुभूती होती असे म्हणणे वावगे ठरणार नाही. त्यांना राजाच्या अमर्याद सत्तेवर नियंत्रण प्रस्थापित करावयाचे होते व जनतेच्या प्रतिनिधींच्या व प्रामुख्याने थर्ड इस्टेटच्या प्रतिनिधींच्या हातात जास्त असावी असे त्यांचे म्हणणे होते. मात्र, सोळाव्या लुईच्या अकार्यक्षमतेमुळे व त्याने लोकांची भावना समजून न घेतल्यामुळे व त्याच्या धरसोड प्रकारच्या वृत्तीमुळे जनतेचा त्याच्यावरील विश्वास उडतच गेला व त्याची राजाला जबर किंमत मोजावी लागली. ही किंमत म्हणजे जनतेने वा क्रांतीकारकांनी शेवटी त्याचा शिरच्छेद करून दिलेली मृत्युदंडाची शिक्षा होय. फ्रान्समधील अनेक विचारवंतांनासुद्धा इंग्लंडच्या धर्तीवरची नियंत्रित राजेशाही फ्रान्समध्ये असावी असे वाटत असे. याचे कारण म्हणजे व्होल्तेर (Voltaire) आदी फ्रेंच विचारवंतांनी काहीकाळ तरी इंग्लंडमध्ये आश्रय घेतलेला होता व त्यांनी इंग्लंडमधील राजाची नियंत्रित सत्ता व लोकांनी निवडलेली संसद ह्या प्रकारचे शासनाचे स्वरूप वा प्रारूप पाहिलेले होते व ते त्यांना भावले होते.

सोळाव्या लुईचे दुर्दैव म्हणजे त्याला वारसा हक्कामुळे मिळालेली गादी व खडखडाट असलेली

तिजोरी होय. तो शेवटपर्यंत राजाची व देशाची आर्थिक स्थिती सुधारू शकला नाही. त्याने जेव्हा चांगले अर्थमंत्री नेमून आर्थिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला त्यावेळी राजाच्या दरबारातील काही प्रवृत्तींनी त्याला विरोध केला व त्या अर्थमंत्र्यांना पदावरून हटवावे लागले. सोळाव्या लुईला राजसत्ता हातात आल्यापासूनच हा राजदंड आपल्याला पेलवेल की नाही अशी शंका होती असे म्हणणे वावगे ठरणार नाही. १७५६ साली मालशेर्ब ह्या मंत्र्याने जेव्हा आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला तेव्हा राजा म्हणाला होता की, 'तू किती भाग्यवान आहेस. मी का त्यागपत्र देऊ शकत नाही?' हे वाक्य ज. द. जोगळेकर लिखीत 'फ्रेंच राज्यक्रांती' ह्या पुस्तकात नमूद केलेले आहे. सोळाव्या लुईला शिकार करण्याचा व स्वतःच्या कुलुपांच्या कारखान्यात काम करण्याचा छंद होता. त्याला जुगार खेळणे पसंत नव्हते. इतिहासकार सांगतात की, एकदा जुगारात पैसे हरल्यावर तो म्हणाला होता, 'जुगारात पैसे हरण्यापेक्षा तो पैसा सैनिकांना उत्तेजन म्हणून दिल्यावर जास्त चांगल्या कामासाठी मार्गी लागला असता.' सोळाव्या लुईला इतिहास, भूगोल, फ्रेंच साहित्य आणि इंग्रजी भाषा यात गती होती. तो इंग्रजी भाषेचा शब्दकोश सतत चाळत असे. अशा ह्या राजाला २१ जानेवारी १७९३ रोजी नॅशनल कन्हवेंशनने मृत्युदंड दिला. त्याचा 'गिलोटिन' ह्या यंत्राच्या सहाय्याने शिरच्छेद करून त्याचे शिर धडावेगळे करण्यात आले व ते शिर प्रक्षुब्ध जमावाला दाखविण्यात आले. नॅशनल कन्हवेंशन ही नॅशनल असेंब्लीनंतर अस्तित्वात आलेली लोकांची एक प्रकारची संसदच होती. 'गिलोटिन' ह्या यंत्राचा शोध डॉ. गिलोटिन नामक व्यक्तीने लावला होता म्हणून त्या यंत्राला 'गिलोटिन' हे नाव पडले. राजाला मारण्याचे कारण म्हणजे, राजाने ऑस्ट्रिया व युरोपमधील इतर काही देशांच्या राजांसोबत संगनमत करून फ्रान्समध्ये घडत असलेली क्रांती थांबविण्याचा केलेला प्रयत्न असे दिले गेले. यासाठी राजावर खटला भरला गेला व त्याला राष्ट्रद्रोही म्हणून सिद्ध करण्यात आले व त्यानंतर त्याला मृत्युदंड देण्यात आला. सोळाव्या लुईची राणी मारी आन्तवायनेत हिच्या नशिबीसुद्धा मृत्युदंड आला. १६ ऑक्टोबर १७९३ रोजी 'गिलोटिन'च्या सहाय्याने मारीचे शिर धडावेगळे करण्यात आले. काही इतिहासकार म्हणतात की, क्रांतीकालीन फ्रान्समध्ये प्रत्येक नकारात्मक घटनेविषयी व गोष्टीसाठी मारी आन्तवायनेतला कारणीभूत ठरविण्याची जणू स्पर्धाच लागली होती. त्यामुळे 'तुम्ही ब्रेड नसेल तर केक खा' अशा आशयाचे उद्‌गार तिने काढले नाहीत असे त्यांचे मत आहे. हे उद्‌गार जगप्रसिद्ध फ्रेंच तत्त्ववेत्ता रुसो लिखित १७६६ साली प्रसिद्ध झालेल्या एका पुस्तकातील होत असे काहींचे मत आहे. १७६६ साली मारीचे वय अकरा वर्षे एवढे होते. त्यावेळी तिचे सोळाव्या लुईसोबत लग्नसुद्धा झालेले नव्हते. १७८९ ची फ्रेंच राज्यक्रांती होण्यास कारणीभूत अजून एक महत्त्वाचे कारण म्हणजे १८ व्या शतकात फ्रान्समध्ये होऊन गेलेले थोर विचारवंत व तत्त्ववेत्ते व त्यांनी त्यांच्या लिखाणाच्या माध्यमातून लोकांचे केलेले प्रबोधन हे होय. ह्या विचारवंतांपैकी वोल्तेर (Voltaire), रुसो (Rousseau), मोंतेसकाइ (Montesquieu) इत्यादी जण होत.

वोल्तेरचा (काही लेखक मराठीत व्हॉल्टेअर असेसुद्धा लिहितात) जन्म २१ नोव्हेंबर १६९४ रोजी पॅरिसमध्ये झालेला होता. त्याचे वडील पेशाने वकील होते. वोल्तेरनेसुद्धा वकील व्हावे अशी त्याच्या वडिलांची इच्छा होती. मात्र, वोल्तेरला लेखक बनण्यामध्ये रस होता. त्यावेळी त्याच्या वडिलांनी काय म्हटले होते याचा उल्लेख ज. द. जोगळेकर लिखित 'फ्रेंच राज्यक्रांती' ह्या पुस्तकात पृष्ठ क्रमांक १६ वर आलेला आहे, हे वाक्य पुढीलप्रमाणे आहे, 'ज्या मनुष्याला आपल्या कुटुंबावर बोजा व्हायचे असेल नि शेवटी क्षुधेने मरावयाचे

सर्व प्रकारची दुष्टता दुर्बलतेतून निर्माण होते. – रसो

असेल तो साहित्याचा धंदा करतो.' वोल्तेरवर ह्या मताचा वा उपदेशाचा काहीच परिणाम झाला नाही व त्याने लेखकच बनण्याचा ठाम निश्चय केला. वोल्तेर आपल्या लिखाणातून तत्कालीन राजकीय व्यवस्थेवर ताशेरे ओढत असे. त्याच्या लिखाणाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात असलेले व्यंग हे होय. वोल्तेर लिखित काही पुस्तकांची नावे कँडिड (Candide), लेटर्स ऑन इंग्लिश (Letters on English), झॅडिग (Zadig) ही होत. तत्कालीन राज्यव्यवस्थेने वोल्तेरच्या लिखाणाचा धसका घेतल्याचे जाणवते. त्यामुळेच त्याला अनेकदा स्थानबद्ध केलेले आढळते. वोल्तेरने काही काळ इंग्लंडमध्ये सुद्धा वास्तव्य केले होते (१७२६-२९) व तेथील सुस्थितीत असलेल्या राजकीय व सामाजिक जीवनाचा व परिस्थितीचा जबरदस्त पगडा वोल्तेरवर पडला होता. वोल्तेरचे कार्य किती महत्त्वाचे होते याची जाणीव ज. द. जोगळेकर लिखित 'फ्रेंच राज्यक्रांती' ह्या पुस्तकातील पृष्ठ क्रमांक १८ वरील एका परिच्छेदातून येते. हा परिच्छेद वाचकांसाठी पुढे उधृत करीत आहोत.

'आपल्या शेतावरची कुळे सुखी नि संपन्न राहतील याची त्याने व्यवस्था केली. राजे लोकही आपल्या प्रजाजनांशी असेच वागतील अशी त्याची अपेक्षा होती. वोल्तेर क्रांतीकारक नव्हता, तो सुधारणावादी होता. समान कायदा, सांप्रदायिक स्वातंत्र्य नि वृत्तपत्राचे स्वातंत्र्य इत्यादी गोष्टी फ्रेंच क्रांतीत साध्य झाल्या. त्यासाठी आवश्यक असणारे बौद्धिक वातावरण वोल्तेरच्या साहित्याने निर्माण केले. अठराव्या शतकात युरोपमध्ये फ्रेंच भाषा सर्वश्रेष्ठ झाली नि युरोपीय राजदरबारात चमकू लागली याचे श्रेय काही प्रमाणात वोल्तेरकडे जाते असे आंद्रे मोर्वा यांनी म्हटले आहे.'

वरील परिच्छेदावरून आपल्या लक्षात येते की, वोल्तेरला ज्या बदलांची अपेक्षा होती ते बदल त्याने स्वतःच्या खाजगी जीवनात अंगिकारले होते. त्यामुळेच त्याने आपल्या शेतावरील कुळांची अतिशय चांगल्या रीतीने काळजी घेतली होती हे लक्षात येते. त्याचप्रमाणे त्याने फ्रेंच भाषा समृद्ध होण्यासाठी व ती युरोपभर प्रसिद्ध करण्यासाठी आपल्या लिखाणाच्या माध्यमातून योगदान दिल्याचे आढळते.

क्रांतीपूर्व काळातील दुसरा अतिमहत्त्वाचा तत्त्ववेत्ता म्हणजे जाँ जॅक रुसो (Jean Jacques Rousseau - १७१२ ते १७७८) हा होय. रुसोचा जन्म २८ जून १७१२ रोजी फ्रान्सचा शेजारी राष्ट्र असलेल्या स्वित्झर्लंडमधील जिनिवा येथे झाला. रुसोने पूर्णवेळ लिखाणाकडे वळण्यापूर्वी वकिलीपासून इतर अनेक व्यवसायांत काम करून पाहिले. मात्र त्यात त्याचे मन रमेना. शेवटी त्याने भटकंती करण्यास सुरुवात केली व तो भटकत फ्रान्समध्ये आला. रुसोच्या लिखाणाची ताकद व त्याला कशाप्रकारे शेतकरी व कष्टकऱ्यांविषयी सहानुभूती निर्माण झाली हे ज. द. जोगळेकर लिखित 'फ्रेंच राज्यक्रांती' ह्या पुस्तकातील पृष्ठ क्रमांक २० वरील दोन परिच्छेदांतून येते. हे परिच्छेद आम्ही खाली उधृत करत आहोत.

'विषमता, दारिद्र्य, अवहेलना इत्यादी गोष्टींचा चटका रुसोला बसला होता. पण एका प्रसंगाने त्याला फ्रान्समधल्या दुर्बल लोकांवर होत असणाऱ्या जुलुमाची तीव्र जाणीव करून दिली. त्याच्या अस्थिर जीवनात तो हिंडत असताना त्याला भूक लागली. तेव्हा तो एका शेतकऱ्याच्या घरात गेला. आणि 'मला भोजन हवे आहे नि त्यासाठी मी पैसे देण्यास तयार आहे', असे रुसोने त्या शेतकऱ्याला सांगितले. रुसोला वाटले की, स्वित्झर्लंडसारखे येथेही पैसे दिले असता उत्तम अन्न मिळेल. पण त्याचा भ्रमनिरास झाला. शेतकऱ्याने त्याला साधा ब्रेड नि दूध दिले. पण त्यामुळे त्याची भूक भागली नाही. ही गोष्ट शेतकऱ्याच्या ध्यानात आली. तो म्हणाला, 'तू सभ्य गृहस्थ दिसत आहेस. तू मला

पापी माणसालासुद्धा सूर्य प्रकाश देत असतो. - सिनेका

फसवणार नाहीस.' मग एका गुप्त दरवाज्याने तो तळघरात गेला नि थोड्याच वेळात उत्तम मद्य, मांस नि ब्रेड घेऊन आला. हे पदार्थ त्याने रुसोला दिले. ते पदार्थ खाल्ल्यावर रुसोची क्षुधा शमली. मग त्याने त्या शेतकऱ्याला पैसे देण्याची तयारी दर्शविली. शेतकऱ्याने त्याला साभार नकार दिला. मात्र त्याने रुसोला सांगितले की, मद्यावरची जकात नि ब्रेडवरचा कर यामुळे तो या गोष्टी लपवून ठेवतो. शेतकऱ्याच्या बोलण्याचा रुसोच्या मनावर कायम परिणाम होऊन जुलमी लोकांविषयी कधीही नष्ट होणार नाही असा क्रोधाग्नी त्याच्या मनात पेटला असे त्याने लिहिले आहे.'

वरील परिच्छेद तत्कालीन फ्रान्समधील परिस्थितीवर सूर्यप्रकाशासारखा उजेड टाकतो. शेतकऱ्यांना लागणारे अन्नसुद्धा चोरून खाण्याची त्यांच्यावर वेळ आली होती. असे असताना, समाजातील सरदार-उमराव व पुरोहितांचा वर्ग (चर्चचे पदाधिकारी) व राजकुटुंब आपले स्वच्छंदी व मजेचे जीवन जगण्यात मश्गुल होता. अशा वातावरणात फ्रान्समध्ये क्रांती झाली नसती तरच नवल असे म्हणावे लागेल.

रुसो लिखित सर्वात महत्त्वाचा ग्रंथ 'द सोशल काँट्रॅक्ट' (The Social Contract) हा होय. ह्या पुस्तकाचा फ्रान्समधील सामान्य जनमानसावर जबरदस्त पगडा होता व त्यातील विचारांनी फ्रेंच जनतेला १७८९ ची क्रांती घडवून आणण्याची नकळतपणे प्रेरणा दिली असे म्हणणे वावगे ठरू नये.

मोंतेसकाइ (Montesquie) ह्या विचारवंताने सुद्धा आपल्या लिखाणाच्या माध्यमातून फ्रेंच जनमत क्रांतीसाठी तयार होण्यास मदत केली. त्याने लिहिलेला सर्वात प्रसिद्ध ग्रंथ म्हणजे 'द स्पिरिट ऑफ लॉज्' हा होय. हा ग्रंथ पूर्ण करण्यासाठी मोंतेसकाइला जवळ जवळ सात वर्षांचा कालावधी लागला. ह्या ग्रंथाचे लेखन १७३५ मध्ये सुरू झाले व मोंतेसकाइने हा ग्रंथ १७४२ साली पूर्ण केला. हा ग्रंथ १७४८ मध्ये प्रसिद्ध झाला. ह्या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात सरकार, संसद व न्यायव्यवस्था ह्यांच्या स्वतंत्र अधिकारांचे केलेले विवेचन व एकमेकांनी दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप न करण्याचा मांडलेला सिद्धांत हे होय. अमेरिका जेव्हा ब्रिटनच्या राजवटीतून स्वतंत्र झाली व अमेरिकनांनी नवीन घटना बनविण्याचे काम सुरू केले तेव्हा त्यांनी मोंतेसकाइच्या ह्या ग्रंथाचा संदर्भ घेऊन त्यातील काही तरतुदींचा स्वीकार केलेला आपणास आढळतो.

वोल्तेअर, रुसो, मोंतेसकाइ ह्यांच्याप्रमाणेच दिदरो, दालांबेर, बॅरन दोलबाक, हेल्वेतिअस इत्यादी विचारवंतांनीसुद्धा आपल्या लिखाणाद्वारे फ्रेंच जनतेचे प्रबोधन करून त्यांना प्रेरणा दिल्याचे आपल्या निदर्शनास येते.

५ सप्टेंबर १७९३ ते २७ जुलै १७९४ हा फ्रान्समधील कालावधी अतिशय भयानक स्वरुपाचा होता. ह्या कालावधीत मोठ्या प्रमाणात अक्षरशः लोकांची कत्तल करण्यात आली. ह्या काळात फ्रान्समध्ये पश्चिमेकडील वेन्डी (Vendee) परिसरात फ्रेंच राज्यक्रांतीच्या विरोधात झालेले उठाव व लढाया तसेच फ्रान्सला बाह्य शक्तींकडून असलेला आक्रमणाचा धोका याची टांगती तलवार सत्ताधाऱ्यांवर होती. त्यामुळेच क्रांतीला विरोध असणाऱ्यांच्या (यात उमराव वर्ग, पुरोहित-चर्चचे अधिकारी इत्यादींचा समावेश होता) मनात न भूतो न भविष्यती प्रकारची भीती निर्माण करण्यासाठी अनेक व्यक्तींचा 'गिलोटिन'च्या सहाय्याने शिरच्छेद करण्यात आला. हे काम कमिटी ऑफ पब्लिक सेफ्टी (Committee of Public Safety) ह्या कमिटीच्या माध्यमातून करण्यात आले. ह्या कमिटीचा वा समितीचा सर्वात महत्त्वाचा सदस्य रॉबस्पिअर (Robespierre) हा होता. रॉबस्पिअरचा जन्म ६ मे १७५८ रोजी उत्तर फ्रान्समधील अरास (Arras) येथे झाला होता. त्याचे

वडील पेशाने वकील होते. रॉबस्पिअरने आपले शिक्षण पॅरिसमध्ये  पूर्ण केले. त्याने कायदा व तत्त्वज्ञान ह्या विषयांचे अध्ययन केले होते. १७८१ मध्ये त्याने शिक्षण पूर्ण करून कायद्याची पदवी घेतली. रॉबस्पिअरने केलेल्या ह्या मृत्यूच्या खेळाला इंग्रजीत 'रेन ऑफ टेटर' (Reign of Terror) असे संबोधले जाते. रॉबस्पिअर अतिशय जहाल समजल्या जाणाऱ्या 'जॅकोबिन क्लब'चा सदस्य होता. त्याचे राहणीमान अतिशय साधारण होते व आवाजदेखील थोडा क्षीण होता. मात्र, ह्याने 'नॅशनल ॲसेम्बली' व इतर ठिकाणी केलेली भाषणे खूप गाजलेली आढळतात. त्याची विचारांची मांडणी व विरोधकांच्या बरोबर वर्मी लागतील असे शाब्दीक घाव हे त्याच्या भाषणांचे वैशिष्ट्य होते. त्याला फ्रान्समधील राजेशाही विषयी किती राग होता व राजाच्या समर्थकांमध्ये रॉबस्पिअरच्या विषयी किती तिरस्कार होता हे राजाचे समर्थन करणाऱ्या काही वृत्तपत्रांतून त्याकाळात रॉबस्पिअरवर झालेली टीका यातून लक्षात येते. एके ठिकाणी एकदा एका वृत्तपत्राने रॉबस्पिअरचा उल्लेख मिराबूचा मर्कट (Monkey of Mirabeau) असा केला होते. हाच तो मिराबू होता की ज्याने स्वतः सरदार वर्गातील असूनसुद्धा इस्टेट जनरलमध्ये सामान्यजनांचे नेतृत्व केले होते व इस्टेट जनरलची जेथे बैठक घेणार होते तेथे सामान्यजनांच्या प्रतिनिधींना प्रवेश नाकारण्यात आला तेव्हा फ्रान्सच्या इतिहासातील प्रसिद्ध अशी 'टेनीस कोर्ट ओथ' (Tennis Court Oath) म्हणजेच टेनीस हा खेळ खेळण्यासाठी बनविलेल्या विशेष क्रीडांगणावर ह्या प्रतिनिधींना घ्यायला लावलेली प्रतिज्ञा होय. ह्या प्रतिज्ञाद्वारे ह्या सदस्यांनी घोषीत केले होते की, जोपर्यंत त्यांच्या मागण्या पूर्ण होत नाहीत तोपर्यंत ते सर्व सदस्य एकत्रच राहतील. फ्रेंच राज्यक्रांतीतील ही घटनासुद्धा अतिशय महत्त्वाची घटना समजली जाते. रॉबस्पिअरने सोळाव्या लुईपासून ते आपला जवळचा सहकारी दांतो (Danton) ह्यांचा गिलोटीनद्वारे वध घडवून आणला. मात्र शेवटी २८ जुलै १७९४ रोजी रॉबस्पिअरचा देखील त्याचपद्धतीने वध करण्यात आला व फ्रान्समधील हा जबरदस्त दहशतीचा काळ संपुष्टात आला.

नॅशनल कनव्हेंशन (National Convation ) व रेन ऑफ टेरर (Reign Terror) हा भयंकर कालावधी संपल्यानंतर फ्रान्समध्ये डिरेक्टरीचे (Directory) राज्य प्रस्थापित झाले. डिरेक्टरीने नोव्हेंबर १७९५ ते नोव्हेंबर १७९९ ह्या कालावधीत फ्रान्समधील अधिकृत सरकार म्हणून काम केले. या कालावधीत डिरेक्टरीला व फ्रान्सला झालेला सर्वात मोठा फायदा म्हणजे ह्या देशाच्या शासकांना नेपोलियन बोनापार्ट नामक अतिशय तरुण, उमद्या व लढवय्या सेनानीची लाभलेली साथ होय. डिरेक्टरीने नेपोलियनला फ्रान्सचे साम्राज्य वाढविण्यासाठीचे अधिकार दिले. नेपोलियननेसुद्धा डिरेक्टरीचे म्हणणे ऐकून इटलीवर तात्काळ हल्ला केला व तेथील अनेक प्रदेश जिंकून मोठ्या प्रमाणात द्रव्य गोळा केले व ते द्रव्य फ्रान्सच्या शासकांकडे पाठवून दिले. इटलीतील ह्या यशामुळे राजधानी पॅरिस व संपूर्ण फ्रान्समध्ये नेपोलियन लोकप्रिय होण्यासाठी फार मोठी मदत झाली. आता फ्रान्सच्या घराघरातून नेपोलियनचे गोडवे गाण्याची व स्तुती करण्याची सुरुवात झाली. ह्याच काळात नेपोलियन फ्रान्स मधल्या जनतेच्या गळ्यातील ताईत होण्यास सुरुवात झाली. 'डिरेक्टरी' सरकारदेखील त्याने इटलीतून मोठ्या प्रमाणात द्रव्य पाठवून दिले म्हणून खूश होते. मात्र, डिरेक्टरीसुद्धा भ्रष्टाचार करण्यात गुंतलेली असल्याचे निदर्शनास येते.

त्यामुळे इजिप्तच्या स्वारीवरून पॅरिसला परतल्यानंतर नेपोलियन बोनापार्टने फ्रान्सची राजसत्ता ताब्यात घेण्याचे ठरविले. त्यासाठी त्याला फ्रान्समधील बहुसंख्य जनतेचा सुद्धा पाठिंबा होता. नेपोलियनचे रणांगणावरील यश पाहून जनतेला असा विश्वास पटला होता की, हाच तरुण आपला 'मसिहा' असून तो

फ्रान्समध्ये प्रबळ सरकारची स्थापना करू शकतो व देशात शांतता प्रस्थापित करून क्रांतीची मूल्ये खऱ्या अर्थाने रुजवू शकतो.

तसे पाहता नेपोलियन हा मूळचा फ्रेंच नव्हता. त्याचा जन्म १५ ऑगस्ट १७६९ रोजी कोर्सिका ह्या बेटावर झाला होता. हे बेट मुलतः जिनोआ ह्या इटालियन प्रजासत्ताकाच्या ताब्यात होते. मात्र १७६८-६९ मध्ये ह्या बेटाचे नियंत्रण फ्रेंचांच्या ताब्यात गेले व कोर्सिका फ्रेंच साम्राज्याचा हिस्सा बनले. त्यानंतर नेपोलियनच्या वडिलांनी नेपोलियनला शिक्षणासाठी पॅरिसला पाठविले. तेथे त्याने लष्करी प्रशिक्षण देखील घेतले. असे म्हणतात की, विद्यार्थी दशेत नेपोलियन अनेकदा एकलकोंडा राहत असे. कारण शाळेतील इतर फ्रेंच विद्यार्थी त्याला इटालियन म्हणून हिणवत असत. तरुणपणी अशाप्रकारे काही प्रमाणात लाजाळू असणाऱ्या तरुणाने पुढे जाऊन फ्रान्स ह्या देशाची धुरा स्वतःच्या हातात घेतली व त्या देशाची कीर्ती संपूर्ण युरोपभर व जगभर पसरविली. त्याने स्वतःला १९ व्या शतकातील सर्वश्रेष्ठ सेनापती म्हणून सिद्ध केले व फ्रान्सची इभ्रत व गतवैभव फ्रान्सला पुन्हा प्राप्त करून दिले.

६ नोव्हेंबर १७९९ रोजी नेपोलियनने डिरेक्टरी विरुद्ध बंड करावे अशा आशयाचा कट रचण्यात आला व साधारणतः १० नोव्हेंबर १७९९ रोजी 'डिरेक्टरी' इतिहासजमा होऊन कॉन्सुलेटच्या (Consulate) च्या सत्तेची सुरुवात झाली. ह्या कॉन्सुलेटमध्ये सुरुवातीला नेपोलियन, सैय आणि ड्युको यांचा समावेश होता. यापैकी नेपोलियनला प्रथम काऊंसूल, सेय द्वितीय काऊंसूल व ड्युको तिसरा काऊंसूल म्हणून ओळखले जाऊ लागले. नंतर १२ डिसेंबर १७९९ ते १८ मे १८०४ या कालावधीत नेपोलियन, जे. जे. कॅम्बासेरेस (J. J. Camba'cre's) व चार्ल्स फ्रँकॉइ लेबूं (Charles Francois Lebrun) हे प्रथम, द्वितीय व तृतीय काऊंसील होते. फस्ट काऊंसील या नात्याने नेपोलियनने फ्रान्समध्ये मोठ्या जोमाने चांगला राज्यकारभार करण्यास सुरुवात केली. त्याने जनतेच्या मनात पुन्हा एकदा आत्मविश्वास निर्माण करण्याचे मोलाचे कार्य केले. त्याची सर्वात मोठी उपलब्धी म्हणजे त्याने फ्रान्समध्ये राजकीय, सामाजिक इत्यादी बाबतीत स्थापन केलेले स्थैर्य होय.

१४ जुलै १७८९ पासून क्रांतीला सुरुवात झाली होती. तेव्हापासून सामान्य फ्रेंच माणूस प्रत्येक नवीन दिवस त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारा ठरेल ह्या आशेवर जगत होता. तसेच दररोज मोठ्या प्रमाणात रक्तपात झालेला पाहात होता व पाहाणे शक्य नसेल तर रक्तपात झाल्याचे ऐकत होता. १७८९ ते १७९९ ह्या दहा वर्षांच्या काळात क्रांती सुरू होती व ती वेगवेगळे टप्पे गाठत होती. अगोदर नॅशनल ॲसेंब्ली नंतर नॅशनल कनव्हेंशन, जॅकोबिन क्लबचा धुमाकूळ, रॉबस्पिअरची 'रेन ऑफ टेरर', सोळाव्या लुईचा वध, मारी आन्तवायनेतचा वध, दांतोचा वध शेवटी ह्या सर्वांचा वध घडवून आणणाऱ्या रॉबस्पिअरचा वध, तद्नंतर स्थापन झालेली डिरेक्टरी ह्या सर्व अनाकलनीय व अनेकदा भयावह वाटणाऱ्या घटना फ्रान्समध्ये ह्या काळात घडत होत्या. ह्या सर्व रक्तपाताला व अस्थैर्याला नेपोलियनने १७९९ मध्ये सत्ता हातात घेतल्यावर एक प्रकारे मूठमाती दिली व जनतेचा आत्मविश्वास उंचावला. त्यामुळेच विद्यार्थी दशेत फ्रेंच विद्यार्थ्यांचे टोमणे ऐकणारा इटालियन वंशाचा नेपोलियन आता संपूर्ण फ्रान्सचा लाडका, आवडता व सर्वांना हवाहवासा शासक बनला होता. फ्रान्सने मोठ्या मनाने त्याचा स्वीकार केला होता व प्रेमाचा वर्षाव केला होता. नेपोलियनला ह्या सर्वांची जाण होती. म्हणूनच सत्ता हातात आल्यावर त्याने तिचा दुरुपयोग न करता सतत जनतेचे कल्याण करण्यासाठी व फ्रान्सची जगात कीर्ती पसरविण्यासाठी आपली सत्ता वापरली. त्यामुळेच नेपोलियनला 'चाईल्ड

ऑफ रेव्होलूशन' (Child of Revolution) म्हणजेच 'क्रांतीचे अपत्य' असे म्हटले जाते. कारण नेपोलियनने जनतेच्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आढळतो. शेवटी नेपोलियनने २ डिसेंबर १८०४ रोजी स्वतःला फ्रान्सचा सम्राट म्हणून घोषीत केले आणि जनतेने त्याचा आनंदाने सम्राट म्हणून स्वीकार केला. ह्याच जनतेने १७८९ मध्ये सोळाव्या लुईला आपला राजा म्हणून झिडकारले होते व तिच जनता आता आपल्या नेपोलियन ह्या सम्राटाचा जयजयकार करत होती. याचा अर्थ १७८९ ते १८०४ या पंधरा वर्षाच्या कालावधीत फ्रान्समध्ये मोठ्या प्रमाणात पुलाखालून पाणी वाहून गेले होते.

फ्रेंच राज्यक्रांती ही जगाच्या इतिहासातील अतिशय महत्त्वाची घटना समजली जाते. याचे कारण, फ्रेंच राज्यक्रांतीच्या माध्यमातून फ्रेंच जनतेने स्वातंत्र्य, समता व बंधुत्व (Liberty, Equality and Fraternity) ह्या त्रयींवर आधारित राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न केला होता. तसेच ह्याच क्रांतीदरम्यान जगातील इतर देशांना नेहमीच प्रेरणा ठरणारा मानवतेच्या हक्कांचा जाहीरनामा (Declaration of the Rights of Man and of the Citizen) प्रसिद्ध करण्यात आला होता. ह्या जाहीरनाम्याचा उपयोग पुढे चालून अनेक देशांना आपल्या राज्यघटना बनविण्यासाठी झाला. ज्याप्रमाणे अमेरिकन राज्यक्रांतीने फ्रेंच लोकांना आपल्या देशातील जुलमी राजवट व असमानतेवर आधारीत समाज उध्वस्त करण्याची प्रेरणा दिली त्याचप्रमाणे १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीने दक्षिण अमेरिका व जगातील इतर भागांतील देशांनासुद्धा प्रेरणा देण्याचे मोठे काम केले. १४ जुलै २०१७ रोजी ह्या महान क्रांतीची सुरुवात होण्याच्या घटनेला २१८ वर्षे पूर्ण झाली. त्यामुळे फ्रेंच राज्यक्रांतीविषयी थोडक्यात माहिती देण्याचा हा खटाटोप व लहानसा प्रयत्न. शेवटी 'फ्रेंच राज्यक्रांती चिरायू होवो!' ह्या क्रांतीदरम्यानच्या फ्रेंच लोकांनी केलेल्या उद्घोषणेने ह्या लेखाचा शेवट करावासा वाटतो.

**संदर्भ :**

फ्रेंच राज्यक्रांती : ज. द. जोगळेकर
फ्रेंच राज्यक्रांती : न. चिं. केळकर
रेव्होलूशनरी युरोप : जॉर्ज रुड
१७८३-१८१५
वर्ल्ड हिस्ट्री : बी. व्ही. राव

**- सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com

•••

---

(पृष्ठ क्र. १४ वरून - **सुभाषित - सात शल्ये)**

घडीलाही अशी अनेक उदाहरणं आपण पाहतो. कवी हृदयाच्या संवेदनशील मनाला हे शल्य बोचत राहतं.

वरील श्लोकात वर्णिलेली शल्ये आजही कुठल्याही सहृदय मनाला सलत व छळत असतात. संवेदनशील मनाचं ते लक्षणच आहे. वरील सुभाषिताचं वामनपंडितांनी सुंदरपणे मराठी भाषांतर केलं आहे. ते असं -

**चंद्राला दिवसा प्रकाश नसणे, ये कामिनीला जरा,**
**पद्मावीण जले, निरक्षरमुखी जो नेटका गोजिरा**
**दात्याला धनलोभ, नित्य वसते दारिद्र्य विद्वज्जनी**
**दुष्टाचा पगडा महीपतिगृही, ही सात शल्ये मनी!**

**- प्रा. प्रशांत धर्माधिकारी**
इंग्रजी विभाग,
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे
भ्रमणध्वनी - ९४२२४९५०९४

•••

---

# मनु + युग + अंतरः एक आकलन

*'मन्वंतर' आणि 'युगांतर' या दोन पुस्तकांचा परिचय या लेखात दिला आहे - संपादक*

धर्म, नीती, तत्त्वज्ञान, शासन या गंभीर विषयांवर तसे पाहिले तर घाऊक प्रमाणावर लेखन होत असलेले आपण पाहात असतो. या संकल्पनांच्या व्याख्या तयार करणे, त्याचे कालोचित संदर्भ देऊन भविष्याविषयी अनुमान मांडणे असा साधारण बाज या लेखनाचा असल्याचे अनुभवास येते. परंतु मानवी अस्तित्वाच्या प्राथमिक अवस्थेपासून ते आजवर या संकल्पनांचे अर्थ, त्याचे स्वरूप आणि त्याचा व्यक्तिजीवनावर, समाजजीवनावर होणारा परिणाम - हा २१ व्या शतकापर्यंत तसाच आणि तितकाच होतो आहे की त्याची तीव्रता कमी झाली आहे? या आणि अशा अनेक मुलभूत प्रश्नांची उत्तरे आपल्याला 'मन्वंतर' आणि 'युगांतर' या दोन पुस्तकांत सापडतील.

ही दोन पुस्तके म्हणजे 'लोकसत्ता' या दैनिकात प्रसिद्ध झालेल्या सुरेश द्वादशीवार या साक्षेपी आणि मार्मिक लेखकाच्या लेखमालांचा संग्रह होय. साधना प्रकाशनाने ही पुस्तके प्रकाशित केली असून 'वैचारिक लेखन' अशा प्रकारचे हे लिखाण आहे. जगात घडून गेलेल्या आणि घडत असणाऱ्या दृश्य बदलांवरून अदृष्टाचा मागोवा घेणे आणि या Abstract बदलांची चर्चा करणे ही या लेखनाची मध्यवर्ती संकल्पना असल्याचे दिसते. या लेखनातून 'केवळ बदल हाच शाश्वत असून बदलांमुळेच मानवी जीवनाला विशिष्ट आकार मिळत जातो आणि तो आकारदेखील शाश्वत नसून त्यातही समयोचित बदल होत जातात' हे अधोरेखित होते. मुळात, मानवी जीवन हे 'केवळ जगणे' एवढेच नसून त्याला सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि मुख्य म्हणजे राजकीय अशा अनेक छटा आहेत. या सगळ्यातून निर्माण झालेला मानवी समाज हा व्यक्ती समूह → समाज → राष्ट्र → विश्व अशा अनेक पातळ्यांवर जगत असतो. प्रस्तुत लेखकाचा भर हा या मानवी समाज नामक आकृतिबंधात होणारे बदल टिपणे यावर असून हे बदल कशामुळे होतात हे पाहणे असा आहे. धर्म, नैतिकता, राजकारण, आस्तिकता, नास्तिकता, समाजकारण, अर्थ अशा अनेक घटकांमुळे समाजाचे उर्ध्वगामी (upward), अधोगामी (downward), समांतर (Horizontal) आणि Vertical असे अभिसरण सातत्याने होत असते. या अभिसरणामुळे मानवी मूल्ये-निष्ठा पार ढवळून निघतात आणि परिणामी मानवी समाज कधी व्यक्तिवादी होतो तर कधी समूहवादी तर कधी राष्ट्रवादी. 'व्यक्तीकडून समूहाकडे' आणि 'समूहगततेकडून व्यक्तीकडे' हा प्रवास निरंतर चालू असतो तो या अभिसरणामुळे.

व्यक्ती → समूह : समूह → व्यक्ती


या सगळ्या मन्वंतराच्या काळात जीवनाची घडी बसवण्यासाठी व्यक्ती समूहाचा आधार घेऊ पाहते आणि मग वेगवेगळ्या व्यवस्था त्यातून आकार घेऊ लागतात. म्हणूनच धर्म, नीती, शासन, मानवी मूल्ये ही चिरकाल टिकणारी असली तरीही समाजानुरूप त्यांनाही संस्थापक स्वरूप धारण करावे लागते. यामुळेच अमुक एका समाजाचे धार्मिक नियम उत्तर धार्मिक समूहांना लागू होत नाहीत. ते अधार्मिक ठरतात आणि वादाची

ठिणगी पडते. व्यवस्थात्मक (Systemic) बिघाड निर्माण होतो आणि मूल्यसंघर्ष उभा राहतो. आणि असा टोकाचा मूल्यसंघर्ष पुढे युद्धाचे स्वरूप घेऊन संपूर्ण मानवी जीवन धोक्यात आणतो. या परिस्थितीचे विश्लेषण करू गेल्यास एक फरक प्रकर्षाने जाणवतो. तो म्हणजे व्यक्ती स्वभावतःच गतिशील आणि बदल स्वीकारणारी, लवचिक असते. परंतु समाज हा स्थितीशील असतो. या स्वाभाविक फरकामुळे व्यक्ती आणि समाज यांनी मिळून बनलेल्या व्यवस्था यंत्रणा नामक गाड्याची चाके अशक्त होतात. यातूनच अपरिहार्यपणे मूलभूत असे क्रांतिकारी बदल होतात आणि शेवटी घडून येते ते युगांतर, मन्वंतर अर्थात कुठलीही व्यवस्था ही कायम टिकणारी नसते.

व्यक्ती ⟶ समाज ⟶ व्यवस्था ⟹ युगांतर मन्वंतर
↓
गतिशील × स्थितीशील = संभ्रम, गतिरोध
↓
अंतर्विरोध

धार्मिक, नैतिक आणि अशा अनेक जन्मदत्त निष्ठांमुळे आजवर झालेल्या हानीचे चटके सहन केलेला २१ व्या शतकातला समाज हा अधिकाधिक व्यक्तिकेंद्री होत असून त्याची वाटचाल 'समूहगततेकडून व्यक्तीकडे' अशा रीतीने होत आहे. हा प्रवास जन्मदत्त निष्ठांकडून प्रगल्भ मानवी मूल्यनिष्ठांकडे सुरू आहे आणि यालाच खरे प्रबोधन म्हणतात, असे या लेखनाचे प्रतिपादन आहे.


व्यक्ती, समाज आणि व्यवस्था यांतील अंतर्विरोध हा परिणामी मन्वंतराला, युगांतराला कारणीभूत ठरतो. हे विविध प्रमाणांसह लेखकाने स्पष्ट केले असून हे केवळ प्रादेशिक नव्हे तर वैश्विक पातळीवर सत्य ठरणारे आहे. उद्याचा समाज हा संकुचिततेपासून मुक्त झालेला, स्वातंत्र्य, समतेसारखी प्रगल्भ मूल्ये जपणारा उदारमतवादी समाज असेल आणि तो क्षुद्र स्वार्थापायी कोणाचीही मुस्कटदाबी– मग ती वैचारिक असो वा आर्थिक,– करणार नाही असा आशावाद या प्रतिपादनातून व्यक्त होतो. विकसित जग, मागास राष्ट्रे आणि तिसऱ्या जगातल्या आपल्यासारख्या देशामध्ये घडणाऱ्या या बदलांचा पोत जरी वेगळा असला तरी या बदलांची दिशा निश्चित आहे. थोडक्यात, हे मूल्यात्मक बदल सार्वत्रिक असून वेगाने घडून येत आहेत हे निश्चित आणि हे चित्र दिलासादायक आहे.




'मन्वंतर' या पूर्वार्धातील पुस्तकात लेखकाने प्रामुख्याने भारताच्या पार्श्वभूमीवर अनेक मूलगामी प्रश्न मांडले असून वैचारिक स्वातंत्र्याची आणि परिवर्तनाची या देशाला असणारी गरज प्रकर्षाने मांडली आहे. तसेच या सगळ्याचा संबंध वैश्विक स्तरावरदेखील जोडला आहे हे विशेष. जागतिकीकरणाच्या झपाट्याने जग लहान होत चालले आहे हे तर खरेच, पण जगाचे

आपली बाजू जर न्याय्य असेल तर दुर्बलही समर्थांचा पराभव करू शकतात. – सॉफोकल्स

सपाटीकरण देखील होत चालले आहे, याचे अनेक दाखले या पुस्तकात सापडतील. 'आमचे मन थांबले की बुद्धी' किंवा 'श्रद्धेच्या वेदीवर ज्ञान-विज्ञानाचा बळी' यासारख्या परखड लेखांतून या देशाच्या वैचारिक प्रगतीसाठी आवश्यक असलेले बदल स्पष्ट होतात.




युगांतर या उत्तरार्धात व्यक्ती, समष्टी, धर्म, नीती, न्याय या वैश्विक मूल्यांचा 'लोकल ते ग्लोबल' असा धांडोळा घेतलेला असून अत्यंत मूलभूत चिंतन मांडलेले आहे. सॉक्रेटिस, प्लेटो-ॲरिस्टॉटल ते मार्क्स-गांधींपर्यंतच्या जागतिक तत्त्वचिंतकांच्या विचारांचा परामर्श घेऊन लेखकाने भविष्यातील 'जगाची' आशादायक पण वास्तव मांडणी केली आहे.

तात्त्विक चिंतनाच्या आणि राज्यशास्त्रीय लिखाणाच्या क्षेत्रातला द्वादशीवारांचा अधिकार मोठा आहे. तरीही, त्यांच्या लिखाणात तसा अभिनिवेश कुठेच दिसत नाही. याउलट टीकाटिप्पणी, वैचारिक मंथन यासाठी मुक्तद्वार ठेवले आहे. आंधळेपणाने 'उगवत्याला नमस्कार' म्हणणाऱ्या आजच्या संकुचित जगात परखडपणे दिलासादायक आणि कठोर मांडणी करणाऱ्या या लेखनातून डोळ्यांत झणझणीत अंजन घातले आहे. शिक्षकाच्या अधिकाराने चुकांवर पांघरूण न घालता उलट कान उपटून चुका दाखवणाऱ्या वाटाड्याची भूमिका या लेखनप्रपंचातून द्वादशीवार पार पाडताना दिसतात. प्राध्यापक, संपादक, लेखक-संशोधक अशा अनेक नात्यांनी द्वादशीवारांनी आपले वैचारिक योगदान दिले आहे. त्यात भविष्यातही त्यांच्याकडून असेच परखड लेखन व्हायला हवे हे नक्की. आपल्या मनाची कवाडे उघडून समस्तांना कवेत घेण्याची सहिष्णू वृत्ती बाणवण्याचा आग्रह या लेखनाचा आहे. अन्यथा,-

**माझ्यासमोर सागर, त्यासी आकाश टेकले**
**झाली असती त्रिवेणी, माझे घर आड आले**

याच मनोवृत्तीत आपण अडकून राहू.

**- प्रा. अपर्णा कुलकर्णी-धर्माधिकारी**
भ्रमणध्वनी - ९४२०४२२१८२

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभाग

दरवर्षीप्रमाणे होळी हा सण मार्च महिन्यात साजरा करण्यात आला. त्यावेळी मुलांनी एक रात्र शाळेत राहून होळी पेटवून हा सण साजरा केला. सकाळी दूध पिऊन मुले घरी गेली.

मुलांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी छंदवर्गाचे आयोजन एप्रिल महिन्यात करण्यात आले होते. मुलांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला.

दिनांक १५/६/२०१७ या दिवशी डॉ. बेडेकर विद्या मंदिरचे प्रांगण लहान मोठ्या शिशुंच्या मुलांच्या किलबिलाटाने गजबजून गेले होते. मुलांच्या स्वागतासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उत्सुक होते. मुलांना गोळ्या वाटण्यात आल्या.

यावर्षी डॉ. बेडेकर विद्या मंदिर पूर्व प्राथमिक विभागात बालवाडी (पूर्व) 'नर्सरी' विभाग सुरू करण्यात आला. हा विभाग सुरू करण्यासाठी विद्या प्रसारक मंडळाचे खूपच सहकार्य लाभले. यावर्षी लहान-मोठा शिशू मिळून २०४ मुले असून नर्सरीला ३७ मुले आहेत.

सन २०१७-१८ यावर्षी पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका विदुला वैद्य या शासकीय नियमानुसार सेवानिवृत्त झाल्या व त्यांच्या जागी विभागप्रमुख म्हणून सौ. सीमा केळकर यांची नियुक्ती झाली.

आपल्या संस्कृतीचे जतन बालमनावर होण्यासाठी प्रत्येक सण, उत्सव शाळेत साजरे केले जातात. यासाठी आषाढी एकादशीला बालदिंडी काढली जाते. हरिनामाच्या गजरात बाळगोपाळ समरस होऊन जातात.

गुरूबद्दल असलेला आदर व्यक्त करण्यासाठी व गुरूंचे महत्त्व कळण्यासाठी 'गुरुपौर्णिमा' साजरी केली जाते. यावेळी व्यासमुनींचे स्मरण करून गुरू शिष्यांच्या जोड्या करण्यात आल्या. यात धौम्यऋषी-अरुणी, रामदासस्वामी-शिवाजी महाराज, द्रोणाचार्य-एकलव्य अशा जोड्या करून त्यांच्या बद्दलच्या गोष्टी मुलांना सांगून हा सण साजरा केला गेला.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, प्राथमिक विभाग

**सन २०१६-२०१७ वार्षिक निकाल**

सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षात ६०७ विद्यार्थी शिकत होते. वार्षिक परीक्षेचा निकाल ९९% लागला असून शासनाच्या आर.टी.ई. नियमानुसार शाळा समृद्धीची १० मानके पूर्ण करून 'अ' श्रेणी प्राप्त केली आहे.

| इयत्ता | एकूण विद्यार्थी | 'अ'श्रेणी प्राप्त विद्यार्थी | 'ब'श्रेणी प्राप्त विद्यार्थी | 'क'श्रेणी प्राप्त विद्यार्थी | 'ड'श्रेणी प्राप्त विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|
| इ.१ली | १०२ | ८१ | १९ | १ | १ |
| इ.२री | १७५ | १४३ | ३० | २ | - |
| इ.३री | १४७ | ८२ | ५८ | ७ | - |
| इ.४थी | १८३ | १३० | ४४ | ९ | - |

**नवागतांचे स्वागत व शासनातर्फे पाठ्यपुस्तकांचे मोफत वाटप :** सोमवार दि. १२ जून २०१७ रोजी इ. १लीतील नवोदित विद्यार्थ्यांचे गोळ्या वाटून स्वागत करण्यात आले. तसेच 'सर्व शिक्षा अभियान' अंतर्गत शासनाकडून आलेल्या शालेय पाठ्यपुस्तकांचे मोफत वाटप शाळेच्या मुख्याध्यापिका व ज्येष्ठ शिक्षिकांच्या हस्ते करण्यात आले.

**पालक सभा** : शनिवार दि. २४ जून २०१७ रोजी इ. १ली ते इ. ४थीच्या सर्व पालकांची सभा घेण्यात आली व सभेमध्ये पालक-शिक्षक संघ व माता पालक संघाची स्थापना करण्यात आली.

**आंतरराष्ट्रीय योगदिन** : २१ जून २०१७ ह्या आंतरराष्ट्रीय योगदिनाचे औचित्य साधून आमच्या शाळेत इ. १ली ते इ. ४थीच्या विद्यार्थ्यांचा 'योगदिन' साजरा केला. त्यावेळी या दिनाचे व आरोग्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावण्यात आले. तसेच प्रार्थना, ध्यानस्थिती, नमस्कार मुद्रा, शिथिलीकरण व इतर आसने करून घेतली.

**आषाढी-एकादशीची दिंडी** : ३ जुलै २०१७ रोजी आषाढ एकादशीची बालदिंडी इ. १ली ते इ. ४थीच्या विद्यार्थ्यांची काढण्यात आली. दिंडीमध्ये विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांची वेशभूषा करून अनेक संतांचे दर्शन दिले. तसेच या दिंडीत विठ्ठल रखुमाईची वेशभूषाही केली होती व विठ्ठल रखुमाईचे प्रत्यक्ष पूजन करून भजन सोहळा साजरा करण्यात आला. या सोहळ्याने शाळेचे वातावरण विठूमय झाले होते.

**गुरुपौर्णिमा** : ८ जुलै २०१७ रोजी गुरुपौर्णिमा हा कार्यक्रम इ. १ली ते इ. ४ थीच्या विद्यार्थ्यांचा घेण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी गुरूंचे महत्त्व सांगितले. गुरू-शिष्यांच्या कथा सादर केल्या. जीवनातील पहिला गुरू आई, त्यानंतर शिक्षक यांच्याकडून मूल हे विद्या ग्रहण करत असते. निसर्ग हा एक सर्वात मोठा गुरू आहे. असे मनोगत मा. मुख्याध्यापिकांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

- दि. २३ जून २०१७ इ. ५ वीच्या विद्यार्थ्यांचे चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले. प्रसंगी इ. ५ वीचे सर्व वर्गशिक्षक, मा. मुख्याध्यापक श्री. गढरी, उपमुख्याध्यापक श्री. पांचाळ उपस्थित होते. विद्यार्थ्यांना शिस्तीसंबंधी मार्गदर्शन व शाळेची माहिती देण्यात आली.
- तिसऱ्या 'आंतरराष्ट्रीय योगदिना'च्या निमित्ताने सर्व स्काऊट-गाईड यांना मा. सौ. रामटेके यांनी या दिनाचे महत्त्व सांगितले. पद्मासन, योगमुद्रा, वज्रासन, पर्वतासन, त्रिकोणासन इ. आसनेही शिकविण्यात आली. तसेच त्यांचे आपल्या शरीरावर होणारे चांगले परिणाम सांगण्यात आले. प्रसंगी उपमुख्याध्यापक श्री. पांचाळ, पर्यवेक्षक श्री. बागुल, गाईड कॅप्टन सौ. बोरवणकर, स्काऊट मास्तर श्री. तळेले, श्री. सोनावणे उपस्थित होते. इ. ५वीच्या विद्यार्थ्यांनीही 'योग दिन' साजरा केला.
- सन २०१६-१७ घेण्यात आलेल्या प्रज्ञा शोध परीक्षेचा निकाल १००% लागला. सदर परीक्षा इ. ६ वी व इ.७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी होती. विद्यार्थ्यांना सौ. धोत्रे यांनी मार्गदर्शन केले होते.
- सन २०१६-१७ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेस इ. ८वीचे एकूण १३ विद्यार्थी बसले होते. पैकी ६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून दोन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली.
- पूर्वनियोजित 'मुख्याध्यापक सहविचार सभा' दि. २८ जून २०१७ रोजी घेण्यात आली. या प्रसंगी विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष मा. डॉ. श्री. विजय बेडेकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.
- दि. २८ जून रोजी ठाणे सामाजिक वनीकरण यांचेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या वृक्षदिंडीत स्काऊटस् व गाईडस् सहभागी झाले होते.
- दि. ६ जुलै रोजी इ. ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांना Alert India हा कुष्ठरोगांविषयी माहितीपट दाखवण्यात आला.
- दि. ८ जुलै रोजी मा. मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, शिक्षकवृंद व पालक प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत शिक्षक

पालक संघ, शालेय व्यवस्थापन समिती, माता पालक संघ यांची स्थापना करण्यात आली.

- इ. ५ वी ते १०च्या सर्व विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमा साजरी केली.
- इ. ९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी दि. ११ जुलै रोजी द. कोरिया येथील माइंड एज्युकेशन इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी 'माइंड एज्युकेशन' या विषयावर व्याख्यान दिले.
- दि. १ व २ जुलै रोजी शाळेत व्यक्तिमत्त्व विकास शिबिर सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत घेण्यात आले. या शिबिरात श्री. राजेश नाईक, श्री. नांदगावकर, श्री. शेख, श्री. हातकर यांनी मार्गदर्शन केले. शिबिरात इ. १० वी डचे ४० विद्यार्थी व विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. शिबिराचे आयोजन उपमुख्याध्यापक श्री. पांचाळ यांनी केले.
- सन २०१७ मध्ये झालेल्या एस्.एस्.सी. परीक्षेचा निकाल ९८.९८% लागला.

| **टक्के** | **विद्यार्थी संख्या** |
|---|---|
| ९० व त्यावरील | २१ |
| ७५ ते ९० | ८० |
| ६० ते ७४ | १२५ |
| ४५ ते ५९ | ६२ |
| ३५ ते ४४ | ०२ |
| नापास | ०३ |

**पहिले १० विद्यार्थी**

| | | |
|---|---|---|
| १) | मेंगडे ओजस अशोक | ९९.८०% |
| २) | पांचाळ जान्हवी राजेंद्र | ९६.८०% |
| ३) | पवार रुपल प्रशांत | ९५.८०% |
| ४) | नांदगावकर शुभम राजेश | ९३.६०% |
| ५) | यादव रुचिता रोहीदास | ९३.००% |
| ६) | भुंडे यश दिपक | ९२.८०% |
| ७) | सूर्यवंशी ओम संजय | ९२.२०% |
| ८) | कांदळकर अजित तुकाराम | ९१.८०% |
| | कोळी अथर्व अशोक | ९१.८०% |
| ९) | काबाडी रिद्धी नयन | ९१.६०% |
| | गायकवाड तृप्ती रविंद्र | ९१.६०% |
| १०) | भागवत दिशा अरविंद | ९१.४०% |
| | खरपुडे मितेश अरुण | ९१.४०% |

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**मार्च २०१७ च्या माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल :**

एकूण विद्यार्थी - १२१
परीक्षेला बसलेले विद्यार्थी - १२१
उत्तीर्ण विद्यार्थी - १२१
टक्केवारी - १००%
विशेष प्राविण्य - ९३
प्रथम श्रेणी - ३२
द्वितीय श्रेणी - ०१
तृतीय श्रेणी - ००

| **टक्के** | **विद्यार्थी संख्या** | **%** |
|---|---|---|
| ९० आणि अधिक | ३७ | ३० |
| ८०-८९ | ४७ | ३९ |
| ७०-७९ | २५ | २१ |
| ६०-६९ | ११ | ०९ |
| ५०-५९ | ०१ | ०१ |
| ४९ च्या खाली | ०० | ०० |

**पहिले दहा क्रमांक :**

| **क्र.** | **विद्यार्थ्यांची नावे** | **%** |
|---|---|---|
| १ | तनुजा महाजन | ९९.०० |
| २ | सुचित गुप्ते | ९८.८० |

| | | |
|---|---|---|
| ३ | राज पाटील | ९७.८० |
| ४ | अमेय दानोले | ९७.२० |
| ५ | मुग्धा कुलकर्णी | ९७.०० |
| ६ | रुची पाठक | ९६.८० |
| ७ | खुशी करोत्रा | ९५.८० |
| ७ | सार्थ निकम | ९५.८० |
| ८ | वृषाली घोटावडेकर | ९५.६० |
| ८ | स्वरांगी गोरे | ९५.६० |
| ९ | इशिता फाटक | ९५.४० |
| ९ | ध्रुव क्रिष्णन | ९५.४० |
| १० | रोहन देव | ९५.०० |
| १० | कनिष्का लाड | ९५.०० |

**विषयातील सर्वप्रथम क्रमांक :**

| विषय | विद्यार्थ्यांची नावे | गुण |
|---|---|---|
| इंग्रजी | ध्रुव क्रिष्णन | ८९ |
| | तनुजा महाजन | ८९ |
| मराठी | अमेय दानोले | ९४ |
| विज्ञान | सुचित गुप्ते | ९८ |
| | वृषाली घोटावडेकर | ९८ |
| | खुशी करोत्रा | ९८ |
| | सार्थ निकम | ९८ |
| समाजशास्त्र | अमेय दानोले | ९८ |
| | तनुजा महाजन | ९८ |
| | सार्थ निकम | ९८ |
| | मुग्धा कुलकर्णी | ९८ |
| | विभव कोदे | ९८ |
| | देवश्री खोपकर | ९८ |
| | खुशी करोत्रा | ९८ |
| हिन्दी | सुप्रतिम दिघे | ९० |
| संस्कृत | अमेय दानोले | १०० |
| गणित | सुचित गुप्ते | ९८ |
| | सार्थ निकम | ९८ |
| | विभव कोदे | ९८ |
| | मुग्धा कुलकर्णी | ९८ |
| | देवश्री खोपकर | ९८ |
| | ध्रुव क्रिष्णन | ९८ |
| | वृषाली घोटावडेकर | ९८ |
| | अमेय कढे | ९८ |
| | रुची पाठक | ९८ |
| | निहार बाम | ९८ |
| | देवयांश निकम | ९८ |
| | आकाश गोरे | ९८ |

**संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षा २०१६-१७ चा निकाल : १००%**

परीक्षेला बसलेले विद्यार्थी - २१

**ब्राह्मण सेवा संघ आयोजित संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षेतील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी :**

१) अदिती पेंडसे - प्रथम क्रमांक (ठाणे जिल्ह्यात)

२) निधी सुर्वे - दुसरा क्रमांक

३) सुरभी लेले - तिसरा क्रमांक

४) प्रीती खामकर - पाचवा क्रमांक

५) परणिका कुलकर्णी - नऊवा क्रमांक

६) वरद लेले - दहावा क्रमांक

७) इशान मलिये - अकरावा क्रमांक

**वाडिया कॉलेज पुणे आयोजित एप्रिल २०१७ महाराष्ट्र प्रज्ञा शोधचा निकाल :**

| इ. | विद्यार्थ्यांची नावे | गुण | शेरा |
|---|---|---|---|
| ८वी | इशान मलिये | १३५ | विशेष |
| ९वी | विश्वराज बोरकर<br>अदिती सूर्यवंशी | १४४<br>११२ | तालुक्यात २ क्र.<br>प्रशस्तिपत्रक |
| १०वी | सिमरन हुद्देदार<br>सुचित गुप्ते | ११२<br>९७ | प्रशस्तिपत्रक<br>प्रशस्तिपत्रक |

**माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०१६-२०१७ चा निकाल :**

**अ) पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ५ वी - फेब्रुवारी २०१७**

परीक्षेला बसलेले विद्यार्थी : ८७
उत्तीर्ण झालेले विद्यार्थी : ७२

| क्र. | शिष्यवृत्तीधारकांचे नाव | गुण | क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | हर्षल पेडणेकर | २६६ | ७ |
| २ | श्रेया दांडेकर | २६२ | १२ |
| ३ | निहारिका मोरे | २५२ | २९ |
| ४ | रिया जोगळेकर | २४८ | ३८ |
| ५ | इरा आपटे | २४४ | ४८ |
| ६ | वरद होसिंग | २४२ | ५२ |
| ७ | ध्रुव राणे | २४० | ५६ |
| ८ | रुग्वेद खोले | २३२ | ७६ |
| ९ | गार्गी देशपांडे | २३२ | ८५ |
| १० | रुद्र पाटील | २३२ | ८७ |
| ११ | सौम्या मराठे | २३० | ९६ |
| १२ | अथर्व कामत | २३० | ९९ |
| १३ | निखील गावडे | २२८ | १०१ |
| १४ | सार्थक कुलकर्णी | २२६ | ११२ |
| १५ | नील श्रोत्री | २२४ | ११६ |
| १६ | श्रीरंग साठे | २२४ | ११७ |
| १७ | रश्मी पिंगे | २२२ | १३३ |
| १८ | शार्वी कदम | २२० | १४१ |
| १९ | जान्हवी केळकर | २२० | १४३ |
| २० | स्नेहा महाजन | २२० | १४४ |
| २१ | वेदांग मेंदूरवार | २१८ | १५७ |
| २२ | हर्ष ठाकुर | २१४ | १८१ |
| २३ | अथर्व साठे | २१४ | १८६ |
| २४ | ईशा लागू | २१२ | १९३ |
| २५ | शुभम कुलकर्णी | २१० | २१८ |
| २६ | साक्षी जोशी | २०८ | २२७ |
| २७ | आदित्य गोखले | २०६ | २४८ |
| २८ | गौरांगी पाटील | २०४ | २७७ |
| २९ | प्राजक्ता भट | २०४ | २७९ |
| ३० | सई दामले | २०० | ३२० |
| ३१ | अर्चिशा भोसले | २०० | ३२३ |
| ३२ | द्विज डोंगा | २०० | ३३१ |
| ३३ | वैभवी गोरे | १९८ | ३४१ |
| ३४ | संस्कृती पिसाट | १९८ | ३४५ |
| ३५ | श्रेया कदम | १९६ | ३७६ |
| ३६ | स्वरांगी वस्ते | १९६ | ३७८ |
| ३७ | रुचिता निमकर | १९० | ४८७ |
| ३८ | मेघ सावला | १९० | ४९२ |

**आ) पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ८ वी - फेब्रुवारी २०१७**

परीक्षेला बसलेले विद्यार्थी : ४५
उत्तीर्ण झालेले विद्यार्थी : ४०

| क्र. | शिष्यवृत्तीधारकांचे नाव | गुण | क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | अदिती पेंडसे | २४८ | २४ |
| २ | अदित्य सामंत | २४० | ४७ |
| ३ | जान्हवी नातू | २३२ | ७१ |
| ४ | अजिंक्य जोशी | २३० | ७५ |
| ५ | सुरभी लेले | २३० | ७७ |
| ६ | इशान मलिये | २३० | ८० |
| ७ | प्रीती खामकर | २२८ | ८३ |
| ८ | वरद लेले | २२४ | १०४ |
| ९ | कांची पूर्णय | २२२ | १११ |
| १० | निधी सुर्वे | २२० | १२० |
| ११ | रिया कोरे | २१२ | १७५ |
| १२ | अन्वय नेरुरकर | २१० | १८२ |
| १३ | केतकी धर्माधिकारी | २०६ | २१६ |
| १४ | समृद्धी पाटील | २०४ | २२४ |
| १५ | रोहन डोंगरे | २०२ | २४१ |
| १६ | सर्वेश शिंदे | २०० | २६७ |
| १७ | चैतन्य परांजपे | २०० | २७० |
| १८ | हित जैन | १९६ | ३०० |
| १९ | यश चाबूकस्वार | १९६ | ३०१ |
| २० | अनू अहिरे | १९४ | ३०८ |
| २१ | अदित्य देशपांडे | १९२ | ३४० |
| २२ | केदार हर्डीकर | १९० | ३७४ |
| २३ | शुभम करमपुरे | १८८ | ३९८ |

•••

(पृष्ठ क्र. ५ वरून - **शांघायचे कला दालन**)

चीनने मागील तीन दशकांत नेत्रदीपक अशी प्रगती केलेली आहे. या प्रगतीची चिन्हे शांघाय शहरात पदोपदी पाहायला मिळतात. शांघाय शहराच्या पुडांग विमानतळावर उतरल्याबरोबर आपल्याला त्याची प्रचीती येते. हे नव्याने बांधलेले विमानतळ असून शांघाय शहराच्या विकासात त्याचा मोलाचा वाटा आहे. विमानतळाचे हे महत्त्व जाणून एका चित्रकाराने त्याचे हुबेहुब चित्र रंगवले आहे. हे चित्र फ्रेम करून ठेवलेले आहे.



**पुडांग विमानतळ**

प्रदर्शन पाहात असताना आमचे लक्ष घड्याळाकडे देखील होते. आम्हाला दिलेली वेळ संपत आल्याचे आमच्या जेव्हा लक्षात आले तेव्हा आम्ही परतीची वाट धरली. ठरलेल्या ठिकाणी गाईड आमची वाट पाहातच होता. त्याने आम्हाला आमच्या हॉटेलला आणून सोडले. हॉटेलला पोहोचल्यावर देखील आमचा चर्चेचा विषय होता ‘कला दालन’. एका सुंदर आणि महत्त्वाच्या ठिकाणाला भेट दिल्याचे समाधान आमच्या सगळ्यांच्या चेहऱ्यावर होते. त्यासाठी आम्ही आयोजकांचे आभार मानले.

**- डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण-शीळ रोड,
काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे - ४२१२०४

माझा प्रवास कधीही थांबू शकत नाही. मला जीवनाचा प्याला तळापर्यंत पिऊन रिकामा करायचा आहे. -टेनिसन

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय)**

हा अनेक वस्तूंची निर्यात करत होता. भारतीय अर्थव्यवस्था त्यामुळे सशक्त होती. १६ व्या शतकात सुरू झालेल्या वसाहत वादामुळे १९ व्या शतकापर्यंत खेड्यांचे कुटीर उद्योग, आणि त्यावर आधारलेली अर्थव्यवस्था मोडीत निघाली. शतकानुशतके नैपुण्यांनी मिळवलेला व्यवसाय नष्ट झाला. आधुनिक औद्योगिकिकरणावर आधारित नवीन शहरीकरण चालू झाले. आधुनिकिकरणाच्या नावाखाली १९ व्या शतकामध्ये महसुलापासून शिक्षणापर्यंत नवीन व्यवस्थांचे रोपण भारतामध्ये करण्यात आले. युरोपमधला विकास हा 'अंधारयुगा'कडून 'विज्ञानयुगा'कडे होता. तर १६ व्या शतकानंतर भारताचा प्रवास 'विज्ञानयुगा'कडून 'अंधारयुगा'कडे चालू झाला. सर्जनाचे मूळस्रोत बंद झाले. साहजिकच यामुळे निर्माण झालेली पोकळी ही विज्ञानच नाही तर पाश्चात्य सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांनी घेतली.

प्रत्येक समाज हा बदलतच असतो, हा बदल जेव्हा त्याच्या परंपरेतून येतो तेव्हा तो त्या परंपरेचाच एक भाग असतो. पण हा बदल जेव्हा बाहेरून लादलेला असतो तेव्हा तो मूळ परंपरेला संदर्भहीन करतो. साहजिकच बदलाचे समर्थन करण्याकरता परंपरेला दूषणे देणे अपरिहार्य होते. भारतीय सांस्कृतिक आणि सामाजिक बदल हे याचे अत्यंत चांगले उदाहरण आहे. भौगोलिक वसाहतवाद १९४७ साली संपला असला तरी सांस्कृतिक वसाहतवाद हा आजही फोफावत आहे. प्रत्येक व्यवस्थेमध्ये कालांतराने अनेक दुर्व्यवस्था येत असतात. त्या दुर्व्यवस्था समजावून घेऊन त्यांना दूर करणे हे सुधारकाचे काम असते. कपाळावर एखादं गळू आले, तर त्याच्या पेशी आणि रक्तप्रवाह या कपाळातूनच निर्माण झालेल्या असतात. प्लास्टिक सर्जन, गळू कपाळाला इजा होऊ न देता कापून काढतो. कपाळाला इजा न करणे हे त्या शस्त्रक्रियेच्या कौशल्यावर अवलंबून असते. सुधारणा म्हणजे मोडतोड नसते. आपल्याकडच्या अनेक सुधारकांनी परंपरेचा मूळ विचारच उद्‌ध्वस्त केला.

आपल्या परंपरेमध्ये 'स्वातंत्र्या'पासून 'पर्यावरणा'पर्यंत सगळ्या गोष्टींचा आदर केला गेला आहे. 'स्वातंत्र्य' आणि 'स्वैराचार' यातील सीमारेषा ही अस्पष्ट असते. सरकारी व्यवस्था असो किंवा कुटुंब असो, 'अनिर्बंध', बेजबाबदार स्वातंत्र्य अशा संस्थांचे अस्तित्वच धोक्यात आणते. नुकतीच सर्वोच्च न्यायालयाने 'खाजगीपणाचा अधिकार निरकुंश नाही' (Right to privacy can never be an absolute entilement) ही केलेली टिपणणी म्हणूनच स्वागतार्ह आहे. भारतामध्ये मंदिर शिल्प असो किंवा वात्सायनाचे कामशास्त्र असो, यांना केव्हांही विरोध झाला नाही. 'श्रृंगार' आणि बिभत्सपणा' यातला फरक आपली परंपरा चांगली जाणून होती.

'स्वातंत्र्य', 'अधिकार' आणि 'लोकशाही' हे आज परवलीचे शब्द झाले आहेत. आजकालची युद्धे ही परंपरागत शस्त्रांपेक्षा अशा आधुनिक शस्त्रांनी लढली जाऊ लागलेली दिसतात. 'प्रबुद्धां'ची लोकशाही, निरपेक्ष नेतृत्व निर्माण करून, लोकानुनयाची धोरणे न राबवता, व्यापक सामाजिक हीत, आणि न्यायावर आधारित विश्वासार्ह व्यवस्था आणू शकते. फक्त आकडेशास्त्रावर आधारित लोकशाही लाचार, गुंड आणि पुंडांची एकाधिकारशाही निर्माण करते. भारतामधील आजची लोकशाही आकडेशास्त्रावर आधारित आहे. या लोकशाहीने एका नवीन राजकीय संस्कृतीला जन्म दिला आहे. अखिल भारतीय असोत किंवा प्रादेशिक; सर्वच राजकीय पक्षांमध्ये याकरता एकवाक्यता आहे. एनकेनप्रकारे सत्ता मिळविणे एवढंच त्याचे ध्येय आहे.

लोकसभेपासून ग्रामपंचायतीपर्यंत आपणच मोठ्या प्रमाणावर गुन्हेगार निवडून दिले आहेत. प्रत्येक राज्यात

शांतपणे वाट पाहणाऱ्या व्यक्तीचे कधीही नुकसान होत नाही. - डब्ल्यू. जी. बेनहॅम

'लालू' आणि 'जयललिता' आहेत. प्रचंड बहुमतांनी ही मंडळी निवडून आली आहेत. अशा राजकारण्यांच्या आता 'वसाहती' झाल्या आहेत. वाढत जाणारे बलात्कार, लूटमार आणि अपघात यांच्या बातम्या देण्याकरता वृत्तपत्रांना आता दर तासाला वृत्तपत्रे काढायला लागली तर नवल वाटायला नको. या लोकशाही देशात नागरिक किती सुरक्षित आहेत हे यामुळे वेगळे सांगायला नको. तरिही अनेक गुन्हे दाखल असलेले आमचे हे 'नेते', पुढे व मागे गाड्यांची आणि पोलिसांची फौज घेऊन संचार करत असतात. वर सांगितलेल्या सर्व नव आयुधांची मदत घेण्याकरता निष्णात वकिलांचे ताफेही यांच्या सेवेत हजर असतात. चुकुनमाकून यांना तुरुंगात जायला लागले, तर आपण निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींचा तुरुंगवास कसा असतो हे सुद्धा आपण बघत आहोतच. उर्मट, अरेरावी, विवेकशून्य राजकीय नेतृत्त्वाच्या High Decibal गोंगाटापुढे आकडेशास्त्रावर आधारित लोकशाहीने लोटांगण घातलेले दिसते. आपला धर्म, संस्कृती म्हणजे काय, एवढंच नाही तर आपल्या सणांच्या (आवाजी) परंपरा काय आहेत? हेही यांनीच आपल्याला सांगायचे, आणि कोर्टाचे नाही, तर यांचे आपण निमूटपणे, आदरपूर्वक ऐकायचे!!

विमानतळ आणि टोलनाक्यावरील लोकप्रतिनिधींची अरेरावी बघायला लागणे, एवढेच नाहीतर त्यांचे हास्यास्पद समर्थनही ऐकायला लागणे, ही लोकशाहीची 'क्रूर' थट्टा आहे. जागतिक स्तरावरील दर्जांच्या निर्देशांकांमध्ये भारतीय विद्यापीठे ही तळापासून १ - २ बोटेच वर-खाली आहेत. साहजिकच, म्हणूनच देशामध्ये मार्कांचा महापूर आणि निकालांचा 'निकाल' लागलेला आपण बघतो. विद्यापीठ कायद्यांमध्ये क्रांतीकारक बदल आपण केला, तो म्हणजे विद्यापीठामध्ये पुन्हा निवडणुका आणल्या!! शालेय शिक्षणात जातीवर आधारित २५% आरक्षण, आणि ८ वी पर्यंत नापास न करण्याच्या धोरणाची कटू फळे पुढील अनेक पिढ्यांना भोगायला लागणार आहेत.

शिक्षणाचा मूळस्रोत हा ग्रंथालय आणि संग्रहालय असतो. आज त्यांची आपण केलेली दुर्दशा बोलकी आहे. वसाहतवाद्यांनी आपले प्राचीन ग्रंथ, आणि वास्तूंची जोपासना करण्याकरता जेवढी ग्रंथालयं आणि संग्रहालयं काढली, त्याच्या निम्यानीही आपण स्वातंत्र्यानंतरच्या ७० वर्षात निर्माण केली नाहीत. आज त्यांची आपण केलेली दुर्दशा बोलकी आहे. आपली वाटचाल आहे ती हजारो कोटींची उधळण करून ऊंच ऊंच पुतळे आणि स्मारके उभारण्यामधे, आणि इतिहासाची पाने फाडण्यात. पुतळ्यासारखा 'निस्तेज' आणि 'निःस्तब्ध' झालेला समाजच फक्त हे सहन करू शकतो. बुटक्यांना उंच चबुतऱ्यावर उभे केले म्हणजे त्यांची ऊंची वाढत नाही.

१९४७ च्या आधीच्या वसाहतवाद्यांनीही आपल्या परंपरेचे जितके बाभाडे काढले नसतील इतके आज आपण आपल्या लोकशाहीमध्ये काढत आहोत. फरक एवढाच आहे की, पूर्वीचे वसाहतवादी बाहेरून आले होते. त्यांना प्रबोधन युगाची परंपरा तरी होती. आजचे वसाहतवादी हे आपलेच सगेसोयरे आहेत. मतांच्या राजकारणात झिंगून आंधळे झालेले आणि प्रबोधनापासून शेकडो मैल दूर.

'यथा प्रजा तथा राजा' अशी एक जुनी म्हण आहे. घराणेशाही जगवणे किंवा गुन्हेगाराला निवडून देणे, हा लोकशाहीत जोपर्यंत गुन्हा ठरत नाही तोपर्यंत हा 'देशी' वसाहतवाद संपुष्टात येणे शक्य नाही.

आरशात दिसते ती आपलीच प्रतिमा असते. दोष आरशाला कसा देता येईल?

**डॉ. विजय बेडेकर**

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे–४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.